बिसेन डेन्टल केअर
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)
दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)
ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०

साप्ताहिक http://berartimes.com
# बेरार टाईम्स
मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे



गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध

आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१३ गोंदिया | अंक ४३ | बुधवार, दि.०२ ऑक्टोबर २०२४ | पृष्ठ-१ | किंमत-३ | Postal Reg.No.NPMFL/107/2022-2024

# ओबीसी विद्यार्थ्यांसाठी ६ तारखेपुर्वी वसतिगृह



- ओबीसी कल्याण मंत्री अतुल सावे यांची घोषणा
- नागपुरात विदर्भातील ओबीसी संघटनांसोबत दीड-दोन तासांची मॅरेथॉन बैठक
- ओबीसींच्या प्रत्येक प्रश्नांवर गंभीर चर्चा, सोडवणुकीसाठी प्रयत्नांचीही ग्वाही

**नागपूर:-** राज्यातील ओबीसी, व्हीजेएनटी, एसबीसी समाजातील विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी आवश्यक वसतिगृह येत्या ६ ऑक्टोबरपर्यंत सुरू करणार, अशी घोषणा ओबीसी कल्याण मंत्री अतुल सावे यांनी केली. यासोबतच ओबीसी संघटनांनी सादर केलेल्या निवेदनातील प्रत्येक प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी महायुती सरकार कटिबद्ध आहे, असा विश्वासही त्यांनी दिला.

विदर्भस्तरीय ३० ओबीसी संघटनांच्या ओबीसी-व्हीजेएनटी समन्वय समितीची बैठक नागपुरातील "महाज्योती' च्या सभागृहात मंगळवारी झाली. तब्बल दीड-दोन तासांवर चाललेल्या या मॅरेथॉन बैठकीत ओबीसींच्या प्रत्येक प्रश्नांवर गंभीरपणे चर्चा करण्यात आली. बहुतांश प्रश्न तत्काळ निकाली काढण्याची ग्वाहीदेखील सावे यांनी दिली. या बैठकीला "महाज्योती'चे व्यवस्थापकीय संचालक राजेश खवले, ओबीसी बहुजन कल्याण मंत्रालयाचे उपसचिव दिनेश चव्हाण, आर्थिक विकास महामंडळाचे अरविंद माळी, ओबीसी बहुजन कल्याण विभागाचे संचालक ज्ञानेश्वर खिल्लारे यांची प्रमुख उपस्थिती होती.

बैठकीच्या सुरुवातीला ओबीसी अधिकार मंचचे खेमेंद्र कटरे बैठकीच्या आयोजनामागची भूमिका मांडली. यानंतर सर्व संघटनांच्या प्रतिनिर्धींनी विषयांना हात घातला. राज्यातील भंडारा,गडचिरोली व चंद्रपूर वगळता इतर जिल्ह्यांतील वसतिगृह अजूनही सुरू झाले नसल्याकडे लक्ष वेधले. हा विषय महत्वपूर्ण असल्याचे पटवून दिले. यानंतर सावे यांनी वसतिगृह तातडीने सुरू करणार असल्याचे सांगत तारीखही जाहीर केली. यासोबतच ओबीसींची जातनिहाय जनगणना करण्यात यावी, सामाजिक न्याय विभागाच्या धर्तीवर राज्यातील सर्व इतर मागास वसतिगृहांत व ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजनेत इयत्ता अकरावीपासूनच्या विद्यार्थ्यांना लाभ देण्यात द्यावा, ज्ञानज्योती सावित्रीबाई फ्फुले आधार योजनेनुसार अनुज्ञेय ठरणारे लाभ देण्यात यावे, इतर मागास बहुजन कल्याण अधिकारी राजेंद्र भुजाडे यांचे निलबंन रद्द करून त्यांना सहाय्यक संचालक इतर मागास बहुजन कल्याण विभाग नागपूर या पदावर पूर्ववत करावे, रखडलेली शिष्यवृत्ती तत्काळ अदा करावी, परदेशी शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थी संख्या ७५वरून २०० करावी, राज्याच्या १२ जिल्ह्यांतील पेसा अंतर्गत असलेल्या गावांमध्ये सर्वेक्षण करून ओबीसी प्रवर्गाचे आरक्षण निश्चित करावे, ओबीसींचा नोकरीतील अनुषेश दूर करावा, जिल्हास्तरावर स्वतंत्र ओबीसी बहुजन कल्याण विभागाचे कार्यालय सुरू करावे, ओबीसी शेतकऱ्यांसाठी स्वतंत्र निधी डीपीडीसीतून देण्यात यावा; "महाज्योती'मार्फत आर्टिफिशियल इंटेलिजन्स, बिग डेटा ,मशीन लर्निंग, आयओटी यासारखे प्रशिक्षण नामांकित संस्थेतून द्यावे, स्पर्धा परीक्षांसाठी विद्यार्थीसंख्या मागील वर्षाप्रमाणे पूर्ववत करावी, "महाज्योती' वर ओबीसी संघटनांच्या प्रतिनिर्धींना संचालकपदावर संधी देण्यात यावी, महाज्योतीचे जिल्हास्तरावर स्वतंत्र कार्यालय सुरू करावे, गोंदिया जिल्ह्याच्या बिरसी येथे महाज्योतीचे पायलट प्रशिक्षण सुरू करावे यासह विविध मागण्यांवर चर्चा करण्यात आली. हे सर्व प्रश्न सोडविण्यासाठी महायुतीचे सरकार कटिबद्ध असल्याची ग्वाहीदेखील सावे यांनी दिली.



## वसतिगृहांना "ओबीसी बहुजन विद्यार्थी वसतिगृह' नाव द्यावे!

**ओबीसी वसतिगृहांना महापुरुषांची, पुढाऱ्यांची नावे देऊन समाजातील एका विशिष्ट जातीलाच झुकते माप दिल्याचा गैरसमज टाळण्यासाठी या वसतिगृहांना "ओबीसी बहुजन विद्यार्थी वसतिगृह' असे नामकरण करावे, अशी मागणी ओबीसी संघटनांनी मंत्री अतुल सावे यांच्याकडे केली. यावरही सावे यांनी सकात्मक विचार करण्याचे आश्वासन दिले.**

## विदर्भातील तब्बल २९ संघटनांचा सहभाग

बैठकीला ओबीसी अधिकार मंचचे खेमेद्र कटरे, ओबीसी सेवा संघाचे कैलास भेलावे, स्टुडंटस राईटस असोसिएशन ऑफ इंडियाचे उमेश कोर्राम, ओबीसी जनमोर्चाचे प्रा. रमेश पिसे, भारतीय पिछडा शोषित संघ ज्ञानेश्वर गोरे, ओबीसी जनमोर्चाचे विलास काळे, भारतीय ओबीसी मुक्ती मोर्चाचे नितीन चौधरी, राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे शेषराव येलेकर, ओबीसी सेवा संघाचे गोपाल सेलोकर, नागपूर सत्यशोधक महिला समितीच्या वंदना वनकर, व्हीजेएनटी संघटनेचे दिनानाथ वाघमारे, ओबीसी संघर्ष समितीचे लोकमन बरडे, ओबीसी युवा अधिकार मंचचे पीयुष आकरे, राष्ट्रीय ओबीसी बहुजन महासंघाचे श्रावण फरकाडे, भारतीय पिषडा शोषित संघटनचे प्रवीण पेटकर, ओबीसी जन मोर्चाचे अशोक दहीकर, बंजारा समाजाचे प्रेमचंद राठोड, भोयर-पवार समाज बहुउद्देशीय मंडळाचे प्रा.अशोक पाठे, ओबीसी संघर्ष समितीचे ज्ञानेश्वर कवासे, तांडा वस्ती सुधारचे नामा जाधव, बंजारा समितीचे राजू रंते, ओबीसी अधिकार मंचचे टोकेश्वर हरिणखेडे, ओबीसी युवा अधिकार मंचचे कृतल आकरे आदी उपस्थित होते.

# प्रशिक्षणार्थी वैमानिकाचे संविधान चौकात आंदोलन

**नागपूर:** महाज्योजीन ओबीसी, व्हीजेएनटी, एसबीसी विद्यार्थ्यांना वैमानिक बनण्याचे प्रशिक्षण देण्याची योजना आणली होती. पण त्यासाठी आवश्यक पायाभूत सुविधा, मनुष्यबळ आणि वेळच्या नियोजनाअभावी या प्रशिक्षणासाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे दोन वर्षे वाया गेले आहे. त्यामुळे विद्यार्थी संतप्त झाले असून प्रशिक्षणासाठी नामांकित फ्लाईंग क्लब, केंद्राची निवड करण्याची आणि तातडीने प्रशिक्षण सुरु करण्याच्या मागणीसाठी संविधात चौकात उपोषणाला बसले.




## मागण्या काय?

**प्रशिक्षण तातडीने सुरु करण्यात यावे, प्रशिक्षणासाठी अन्य संस्थेची निवड करण्यात यावी, प्रशिक्षणार्थ्यांना प्रतिमहिना ५० हजार विद्यावेतन देण्यात यावे आदी मागण्या करण्यात आल्या आहेत.**

महाज्योतीने ओबीसी मुलामुलींसाठी कमर्शियल पायलट प्रशिक्षण देण्याची योजना अडीच वर्षापुर्वी सुरु केली. नागपूर फ्लाईंग क्लबला हे प्रशिक्षणाचे काम देण्यात आले. त्यासाठी महाज्योती नागपूर फ्लाईंग क्लबला प्रती विद्यार्थी २८ लाख रुपये शुल्क देत आहेत. या प्रशिक्षणासाठी २० प्रशिक्षणार्थी विद्यार्थी असून यामध्ये आठ मुलींचा समावेश आहे. या नागपूर फ्लाईंग क्लबचे अध्यक्ष नागपूर विभागीय आयुक्त आहेत. हे कमर्शियल पायलट प्रशिक्षण १८ महिन्यात पूर्ण व्हावे अशी करारात अट आहे. परंतु ३० एप्रिल २०२४ ला १८ महिने झाल्यावर क्लबच्या बेफिकीरीमुळे महाज्योतीच्या विद्यार्थ्याचे प्रशिक्षण पूर्ण होऊ शकले नाही. एवढेच नाही तर प्रत्यक्ष २०० तास विमान उडवण्याचे प्रशिक्षण देणे आवश्यक असते. काही विद्यार्थ्यांना तर आजवर विमानाचे दर्शनही झाले नाही. महाज्योतीने सुमारे ८ कोटी रुपये खर्चून उपयोग झाला नसल्याची चर्चा आहे.

आंदोलनात ऋतुंबरा देवकाते, स्नेहल खैरनार, हार्दिका गोंधळे, सानीका निमजे, भक्ती पाटील, प्रणव सावरकर, तेजस बडवार, भिष्मानंद जाधव स्वप्नील चव्हाण, सुभम गोसावी, जयेश देमशुख, अविनाश येरणे, रोहित बेडवार हे प्रशिक्षणार्थी आमरण उपोषणाला बसले आहेत.

# विधानसभा निवडणुकीत जिल्ह्यात भाजपसमोर तगडे आव्हान!

**गोंदिया** - राज्यात विधानसभा निवडणुकीचे बिगुल वाजले असून केव्हाही आचारसंहिता जाहीर करण्यात येवू शकते. निवडणुकीत यावर्षी प्रथमच मुख्य सात ते आठ पक्ष निवडणुकीच्या रिंगणात राहणार असल्याने कोण बाजी मारणार याची उत्सुकता सामान्य मतदाराला आहे. अशातच भाजपला आपले सातत्य राखण्यासाठी प्रत्येक जिल्हानिहाय मतदार संघावर करडी नजर ठेऊन सर्वसमावेशक उमेदवार निवड करणे आवश्यक असून गोंदिया जिल्ह्यातील चारही मतदार संघ आपल्या ताब्यात ठेवण्यासाठी भाजपला तगडे आव्हानाला सामोरे जावे लागणार आहे.

गोंदिया जिल्ह्यातील अर्जुनी मोरगाव- सडक अर्जुनी मतदार संघ हा अनुसूचित जाती प्रवर्गासाठी राखीव आहे. मागील वेळी भाजपच्या वतीने कॅबिनेट मंत्री राहिलेल्या इंजी. राजकुमार बडोले यांचा राष्ट्रवादी काँग्रेसच्या नवख्या उमेदवार मनोहर चंद्रिकापुरे यांनी अल्पमताने पराभव केला. आता मात्र राज्यात पुलाखालून बरेच पाणी वाहून गेल्याने एकमेकांचे कट्टर विरोधक आता एकत्र असल्याची परिस्थिती पहावयास मिळत आहे. विद्यमान आमदार मनोहर चंद्रिकापुरे यांनी अजित पवार गटासोबत राहण्याच्या निर्णय घेतल्याने आता ते महायुतीमध्ये भाजप सोबत आहेत. महायुती मध्ये या मतदार संघात राष्ट्रवादी काँग्रेस व भाजपची ताकद बरी आहे. शिंदे शिवसेना फ्फार प्रभावी नाही. त्यामुळे उमेदवार ठरवताना महायुतीच्या घटक पक्षांना नाकीनऊ येत आहे. अर्जुनी मोरगाव मतदार संघात उमेदवारी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाला मिळेल की भाजपला ही येणारी वेळ सांगेल. असे असताना मात्र महायुती कडून विद्यमान आमदार मनोहर चांद्रिकापुरे तसेच त्यांचे सुपुत्र सुगत चांद्रिकापुरे यांनी या मतदार संघावर आपला अधिकार दाखवीत कामाला लागले आहेत. त्याचप्रमाणे जर नवीन चेहरा द्यायचा झाल्यास जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष इंजी. यशवंत गणवीर यांचा ही डोळा या मतदार संघावर आहे. विशेष म्हणजे यावेळी राष्ट्रवादीच्या उमेदवाराला' अँटी इनकमबन्सी' चा फटका बसण्याची चिन्हे आहेत.मागील निवडणुकीत अल्पशा मताने पराभूत झालेले भाजपचे इंजी. राजकुमार बडोले यांनी ताल ठोकला आहे. मागील चार वर्षांपासून मतदार संघ पिंजून काढला आहे. त्यांचा अनुभव व काम करण्याची शैली बघता मतदारांना त्यांनी आपल्याशी जोडून ठेवल्याचे दिसून येत आहे. राजकुमार बडोले यांचा पर्याय म्हणून भाजपच्या एका नेत्याने काँग्रेस मधून रत्नदीप दहिवले यांना पक्षात घेत त्यांना ही तयारी ठेवण्याचे सांगितल्याचे समजते. मात्र दहिवले यांचा टिकाव लागण्याची सुतराम ही शक्यता नाही. त्यामुळे या मतदार संघात महायुतीने भाजपला ही जागा सोडल्यास व भाजपने राजकुमार बडोले यांना उमेदवारी दिल्यास ही जागा भाजप आपल्याकडे खेचून आणण्याची चिन्हे आहेत.

देवरी - आमगाव - सालेकसा हा मतदार संघ अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी राखीव आहे. २०१४ मध्ये भाजपकडे असलेला हा मतदार संघ यावेळी २०१९ मध्ये काँग्रेस ने आपल्याकडे खेचून आणला. या मतदार संघात महायुती व महाविकास आघाडीच्या सर्वच पक्षांचे मतदार असले तरी महायुतीत हा मतदार संघ भाजप कडे आहे. या मतदार संघात राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाची ही ताकद बऱ्या प्रमाणात आहे. त्यामुळे जागा वाटपात हा मतदार संघ कुणाला जाणार हे नंतर कळणार असले तरी महायुतीच्या दोन्ही पक्षांनी तयारी सुरू केलेली आहे. या मतदार संघात भाजपकडून माजी आमदार संजय पुराम हे एकमेव चेहरा कामाला लागला असला तरी त्यांना मतदार स्वीकारतील की नाही हा प्रश्नच आहे. २०१४ मध्ये आमदार होण्यापूर्वी त्यांच्या पत्नी या जिल्हा परिषदेच्या सभापती होत्या. २०१९ मध्ये त्यांचा पराभव झाला. त्यानंतर पुन्हा त्यांनी आपल्या धर्मपत्नी सविता पुराम यांच्यासाठी जिल्हा परिषदेची उमेदवारीआणून विजय मिळवून पुन्हा जिल्हा परिषद सभापतीची माळ गळ्यात घातली. त्यामुळे आलटून पालटून सत्ता त्यांच्याच हातात असल्याने इतर पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी नाराजीचा सूर आवळला आहे. भाजपने जर नव्या चेहऱ्यावर विश्वास दाखविला तर निश्चितच त्याचा फ्फायदा भाजपला होणार, यात काही शंका नाही. हा राखीव मतदार संघ राष्ट्रवादी काँग्रेस (अजित गट) आपल्या ताब्यात ठेवण्यासाठी आग्रही आहे.

तिरोडा - गोरेगाव मतदार संघ हा भाजपचा परंपरागत गढ राहिलेला मतदार संघ आहे. या मतदार संघात ओबीसी मते सर्वाधिक असल्याने भाजपनेही या मतदार संघात ओबीसी उमेदवाराला व त्यातही पोवार समाजाच्या उमेदवाराला प्राधान्य दिले आहे. या मतदार संघात भाजपने दोन वेळा सलग विजय मिळविला आहे. भाजपला आताही विजयाचा आत्मविर्श्वास आहे. मात्र तो अतिआत्मविश्वास ठरू नये याची काळजी मात्र पक्षाला घ्यावी लागेल. या मतदार संघात महायुतीच्या घटक पक्षापैकी सर्वाधिक ताकद ही भाजपची आहे, यात काही शंका नाही. या मतदार संघाचे नेतृत्व भाजपचे विद्यमान आमदार विजय रहांगडाले मागील दहा वर्षांपासून करीत आहेत. यावेळीही त्यांची दावेदारी सर्वात महत्वाची मानली जात आहे. त्यांच्यासह या मतदार संघात भाजपचे युवा मोर्चा अध्यक्ष ओम कटरे, जिल्हा परिषद अध्यक्ष पंकज रहांगडाले, जिल्हा परिषद बांधकाम सभापती संजय टेंभरे, माजी आमदार हेमंत पटले हे सुद्धा निवडणूक लढण्यास इच्छुक आहेत. भाजप आमदार विजय रहांगडाले यांनी विकास कामे केली असली तरी काही भागातील रस्त्यांची समस्या त्यांच्यासाठी डोकेदुखी ठरली आहे.

त्यातही त्यांना 'अँटी इनकमबन्सी फॅक्टर' चा फटका ही बसण्याची चिन्हे आहेत. त्यामुळे या हक्काच्या जागेवर भाजपला सूक्ष्म नियोजन करणे गरजेचे ठरेल. या मतदार संघात नवीन उमेदवार दिला तर परिस्थिती वेगळी असेल, असे या भागातील मतदारांचे म्हणणे आहे. त्यामुळे भाजपसाठी हक्काची जागा असलेला तिरोडा - गोरेगांव मतदार संघ ऐनवेळी डोकेदुखी तर ठरणार नाही, हे पाहणे आवश्यक आहे.

# तिरोडा-गोरेगाव मतदार संघात पक्षापक्षातील नेत्यांमध्ये चढाओढ



**गोंदिया :** महाराष्ट्र विधानसभेच्या २८८ जागा वाटपासाठी राजकीय पक्षांमध्ये चढाओढ सुरू झाल्याचे दिसत असून, अशीच काहीशी परिस्थिती तिरोडा-गोरेगाव विधानसभा मतदारसंघातही दिसून येत आहे. निवडणुकीत मीच उमेदवारीसाठी योग्य आहे. मलाच पक्षाने उमेदवारी दिली पाहिजे, अशी फिल्डींग लावून पोस्टरबाजी करणे, धार्मिक उत्सवात सहभागी होणे, भेटीगाठी घेणे सोबतच मतदारसंघात केलेल्या कामाचा कांगावा करण्याचे सत्र सुरू झाले आहे.

तिरोडा-गोरेगाव विधानसभा मतदारसंघात १० वर्षांपासून भारतीय जनता पक्षाचे आमदार विजय रहांगडाले यांची एकहाती सत्ता आहे. त्यामुळे माजी आमदार हेमंत पटले, ओम कटरे, धनंजय तुरकर, जिल्हा परिषद अध्यक्ष पंकज रहांगडाले, रेखलाल टेंभरे भारतीय जनता पक्षाकडून उमेदवारीकरिता फिल्डींग लावून आहेत. विद्यमान आमदार विजय रहांगडाले यांना निवडणुकीच्या रिंगणात टक्कर देण्यासाठी रविकांत (गुड्डू) बोपचे हे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षातून तयार झाले आहेत. त्यांनी तिरोडा येथे शक्तीप्रदर्शन दाखविण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचा भर पावसात महामेळावा आयोजित करीत आपली फुंकार मारली आहे.सध्या त्यांनी मतदारसंघात परिवर्तन जनआशीर्वाद यात्रा काढली आहे.या यात्रेतून ते मतदारसंघ पिंजून काढत आहेत.सध्याच्या घडीला त्यांनी गेली पाच वर्ष मतदारसंघात सातत्य टिकवून ठेवल्याने त्यांच्याप्रती वातावरण अनुकूल वाटत असले तरी स्वभावात थोडा बदल करण्यासोबतच शांत,संयम ठेवण्याची नितांत गरज आहे,जे सध्याच्या परिस्थितीत दिसून येत नाही.



विद्यमान आमदार रहांगडाले हे देखील विश्रांती न घेता विधानसभा मतदारसंघातील प्रत्येक गावांत जावून भेटीगाठी घेत आहेत.महिला मेळाव्याच्या माध्यमातून महिलांना साद घालत आहेत.ते सलग तिसऱ्यांदा मैदानात उतरण्याची तयारी करीत आहेत.१० वर्षातील कामाचा पाढा मतदारासमोर मांडत असतनाच कामे फक्त मोजक्याच कंत्राटदारांनी भाऊनी दिली हा सुर कार्यकर्त्यामधून येऊ लागला आहे.

भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षातील नेतेमंडळींमध्ये संधीचा फायदा घेऊन आमदार व्हावे, या उद्देशाने उमेदवार रांगा लावून आहेत. यात जिल्हा परिषद सदस्य जितेंद्र कटरे, पी. जी. कटरे, दिलीप बन्सोड, ॲड टी. बी. कटरे अशी अनेक नावे आहेत. आम आदमी पक्षाचे रमेश ठाकूर हे देखील तयारीला लागले आहेत. गोरगरिबांना त्यांचे हक्क मिळाले पाहिजे यासाठी धावपळ करताना ते दिसत आहेत. इतर राजकीय पक्षांचे नेतेही जोरकसपणे निवडणुकीच्या कामाला लागले आहेत.

# दोन बिबट मृतावस्थेत आढळले

**अर्जुनी मोरगाव:** तालुक्यातील बोदरा गावशिवारात एका नर बिबट मृतावस्थेत आढळला. ही घटना (ता.१) सकाळी ११.३० वाजता सुमारास निदर्शनास आली. या बिबट्याचा मृत्यू एका वाघाशी झालेल्या झुंजीत झाला असावा, असा अंदाज वर्तविला जात आहे. तर दुसरी घटना गोंदिया-तिरोडा मार्गावरील मजितपूर गावशिवारातील असून ३० सप्टेंबरच्या रात्री ९ वाजता सुमारास वाहन अपघातात एक बिबट ठार झाला. या दोन्ही घटनांमुळे वनविभागाचा एकच खळबळ उडाली आहे. उल्लेखनिय असे की, आठवडाभरापूर्वीच वनक्षेत्रात वाघाच्या संघर्षात दोन वाघांचा मृत्यू झाल्याची घटना घडली होती.

वनक्षेत्रात आपले वर्चस्व गाजविण्याच्या नादात एका वाघाने चांगलाच धुमाकूळ घातला आहे. आठवडाभरापूर्वी दोन वाघ मृतावस्थेत आढळले. त्या दोन्ही वाघांचा मृत्यू दुसऱ्या वाघासोबत



झालेल्या संघर्षात झाल्याचे समोर आले. या घटनेची शाई सुकली नाही की, आज (ता.१) सकाळी अर्जुनी मोरगाव वनपरिक्षेत्रातंर्गत येत असलेल्या बोदरा गावशिवारातील जंगलात एक बिबट मृतावस्थेत आढळला आहे. या घटनेची माहिती मिळताच वनविभागाचे अधिकारी, वन्यजीव मित्र मुकूंद धुर्वे यांनी घटनास्थळ गाठून पंचनामा केला असता घटनास्थळी एका वाघाच्या पायाच्या खुणा दिसून आल्यात.

तसेच मृत बिबट्यावर जखमा दिसून आल्या. त्यामुळे या बिबट्याचा मृत्यू वाघाशी झालेल्या झुंजीत झाला असावा? असा प्राथमिक अंदाज वर्तविला जात आहे. तर दुसऱ्या घटनेत एका बिबट्याचा मृत्यू वाहन अपघाताने झाल्याने बाब समोर आली आहे. (ता.३०) रात्री ९ वाजता सुमारास गोंदिया-तिरोडा मार्गावरील मजितपूर शिवारात अपघातात जखमी झालेल्या बिबट्याचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली. दरम्यान वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळ गाठून मृत बिबट्याला कुडवा येथील वनपार्कमध्ये आणून त्याच्यावर उत्तरीय तपासणी करण्यात आली. यावेळी वन्यजीव मित्र सावन बहेकार, रूपेश निंबार्ते यांच्यासह वनविभागाचे अधिकारी उपस्थित होते. या दोन्ही घटनांमुळे वनविभागात एकच खळबळ उडाली आहे.

## संपादकीय

### न्यायव्यवस्थेचा एन्काऊंटर?

बदलापूर बालिका लैंगिक अत्याचार प्रकरणात झालेले आरोपीचे एन्काउंटर आणि त्यानंतर लोकांनी पेढे वाटून, फटाके फोडून, नाचून एंजॉय करत एन्काउंटरला दिलेला प्रतिसाद. बलात्कार करणाऱ्याला कडक शिक्षा व्हावी याबद्दल दुमत नाहीच. पण आपल्या देशात शिक्षा देण्याचे काम न्यायालय करते. ते पोलिसांनी एन्काउंटर करून किंवा जनतेने मॉब लिंचिंग द्वारे करायचे नसते. कारण, एक तर आपल्याकडे कायदा आहे, न्यायालये आहेत. आणि दुसरे म्हणजे, अशा एन्काउंटरचा प्रयोग राजकारण, धर्माकरण, पोलिसांचा किंवा कोणाचा तरी स्वार्थ इत्यादि कारणांमुळे देखील होऊ शकतो. तसेच, दिसला बलात्काराचा आरोपी की करा त्याचा एन्काउंटर, टाक त्याला मारून, हा ट्रेंड त्यामुळे प्रचलित होऊ शकतो. एकदा का हा ट्रेंड प्रचलित झाला की खोटी केस टाकून एन्काउंटर करण्याचे सुद्धा अस्तीत्वात येऊ शकते. एकदा का तुमच्यावर बलात्काराची केस दाखल झाली की तुम्ही बलात्कार केलेला असो वा नसो, तुम्ही वरील न्यायाने बलात्कारीच ठराल. मग कोर्ट वगैरे राहिले बाजूला, एक तर एन्काउंटर किंवा झुंडबळी व्हायची तयारी ठेवावी लागेल. आणि त्यात अनेक निष्पाप पुरुषांचा नाहक बळी जाऊ शकतो. याच रॅकेटचा अजून एक पैलू म्हणून तुमच्या ध्यानी मनी नसताना, भर रस्त्यात कोणीतरी महिला तुमच्या जवळ येऊन, याने माझ्यावर बलात्कार केला म्हणून बोंबा ठोकू शकते आणि आसपास उभे असलेले रॅकेटमधील लोक तसेच आता मॉब लिंचिंगसाठी सरावलेला जमाव मिळून तुम्हाला एवढे ठोकून काढतील की तुम्ही जीवंत देखील राहू शकणार नाही. इथे तर पोलीसात केसही दाखल झालेली नसेल. Sexual harrasment च्या तथ्य नसलेल्या अनेक केसेस अनेक कार्यालयात पाहायला मिळतात.

मग हा बलात्काराचा आरोप असलेला आणि नाहक बळी जाणारा निष्पाप पुरुष एखाद्या पुरुषाचा किंवा महिलेचा मुलगा, बाप, भाऊ, कोणीही असू शकेल. आणि हो, तुम्ही स्वतःही असू शकाल. उद्या तुमचाही एन्काऊंटर होऊ शकतो. आणि बळी गेल्यावर सुद्धा पेढे वाटले जातील, फटाके फोडले जातील, लोक नाचून सेलीब्रेट करतील, जसे बदलापूर आरोपीचे एन्काउंटर झाल्यावर लोकांनी केले.

आज बदलापूर प्रकरणातील आरोपीचा एन्काउंटर झाला म्हणून पेढे वाटत असताना, फटाके फोडत असताना, नाचत असताना, सेलीब्रेट करत असताना आपण न्यायव्यवस्थेचे बारा वाजवत आहोत आणि आपल्या पुढच्या पिढ्यातील पुरुषांची कबर खोदण्याची व्यवस्था करीत आहोत हे लक्षात ठेवावे. न्यायालयाबाहेर जर प्रकरणांचे असे परस्पर निकाल लावून शिक्षा दिली जाणार असेल तर आज सुपात असलेले तुम्ही उद्या जात्यात असाल हे विसरू नका. या देशाच्या राष्ट्रपित्याला मारणाऱ्या नथुराम गोडसेला सुद्धा न्यायालयानेच शिक्षा दिली होती. त्यानंतरच गोडसेला फाशी देण्यात आले. एन्काऊंटर केला गेलेला नव्हता. तेव्हा तर देश स्वतंत्र होऊन केवळ दोन वर्षे झाली होती.

आरोपी अक्षय शिंदेंनं "अचानक' पोलिसांवर हल्ला केला. तेही हातात बेड्या असताना. त्यानंतर पोलिसाच्या कमरेचे प्पिस्तुल खेचून पोलिसांवर गोळ्या मारल्या. त्यानंतर पोलिसांना "नाईलाजाने' त्याच्यावर गोळी चालवावी लागली.यात सरकारचे अभिनंदन करण्यासारखे काय घडले? आरोपीचा "असा ना तसा' मृत्यू झाला हे बरेच झाले, असे वाटणे ही भावना पण अयोग्य आणि या "अचानक' घडलेल्या,"अपघाती' घटनेबद्दल सरकारचे कौतुक होणे, ही गोष्ट मला चिंताजनक आणि विकृत वाटते.

समाजातील गुंड-पुंडांना खरे तर कायदा, न्यायव्यवस्थेची भीती वाटली पाहिजे. मात्र सध्या ती वाटत नाही. राजकारण आणि गुन्हेगारी यांचे एकत्रीकरण हा अत्यंत गंभीर विषय आहे.

त्याचा धोका लोकशाहीला आहे. आपल्या आसपासच्या लोकप्रतिनिधींकडे नजर टाकली तर त्यातील किती जणांवर खून, बलात्कार यासारखे आरोप आहेत हे लक्षात येईल. कायदेशीर बाबींना उशीर लागतो, हा अनुभव लक्षात घेत थेट तातडीचा न्याय देण्याचे नवे तंत्र अवलंबले जाते, असे म्हणायचे का ? एक कायदा, इतिहास आणि राज्यशास्त्र यांचा अभ्यासक आणि पत्रकार या नात्याने जर असे तंत्र अवलंबत असतील तर ते योग्य नव्हे!

एनकाउंटर या शब्दाचा अर्थ अचानक होणारी सशस्त्र चकमक ज्यात एक बाजूला कायद्याचे रक्षक तर दुसऱ्या बाजूला कायद्याला न मानणारे असतात. अशा चकमकी किंवा एन्काऊंटर अगदी काश्मीर पासून , मुंबईच्या अंडरवर्ल्ड पर्यन्त सगळीकडे होत असतात. जवळपास प्रत्येक एन्काऊंटर वर बनावट असल्याचा आरोपही केला जातो.त्याची चौकशी केली जाते. आणि बऱ्याच ठिकाणी या चकमकी बनावट असल्याचा आरोप सिद्धही झाला आहे. नरेंद्र मोदी गुजरातचे मुख्यमंत्री असताना झालेल्या बहुचर्चित सोहराबुद्दीन एन्काऊंटर झाली होती. त्या प्रकरणांत दोन आयपीएस ऑफिसरसह इतर पोलीस कर्मचारी जेल मध्ये गेले. सध्याचे गृहमंत्री अमित शहा हेसुद्धा याच कारणासाठी जेलची हवा खाऊन आलेत. हैदराबाद येथील बलात्कार प्रकरणातील चार आरोपींची चार वर्षांपूर्वी एन्काऊंटरमध्ये हत्या करण्यात आली होती. त्यावर आजही प्रश्नचिन्ह उपस्थित केले जातात.

आर्मी मध्ये पण अशा प्रकारच्या बनावट चकमकी घडतात. कर्नल दर्जाच्या एच एस कोहली या ऑफिसरने आसाम मध्ये २००३ साली पाच अतिरेक्यांना पकडून नंतर बनावट एन्काऊंटर घडवून आणली. आपल्या अंगावर केचप ओतून त्यानी अतिरेक्यांनी गोळीबार केल्याचा बनाव केला. अर्थात त्यांच्यावर बडतर्फीची तसच इतरही कारवाई करण्यात आली.

अजमल कसाब , हा जगातील जिवंत पकडला गेलेला पहिला अतिरेकी. त्याला जिवंत पकडला असताना त्याच्याजवळ सापडलेली हत्यारे आणि मुंबई छत्रपती शिवाजी टर्मिनस समोरील पुलावरून उतरताना त्याचा काढलेला फोटो यामुळे अजमल कसाब आणि त्याच्या इतर नऊ साथीदारांच्या सत्यासत्यते बद्दल कोणीही आवाज उठवला नाही.

पण दिल्लीतील बटाला हाऊस एन्काऊंटर, किंवा मुंबईतील अनेक गँगस्टर एन्काऊंटर वर मानव अधिकार कार्यकर्ते आणि इतर व्यक्तींनी आवाज उठवला होता. गँगस्टर अमर नाईक चे वडील यांनी एन्काऊंटर मध्ये आपला मुलगा मारला गेल्यानंतर रात्री होणाऱ्या एनकाउंटरवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते. अर्थात आता सीसीटिव्ही फुटेज, लाईव्ह रेकॉर्डिंग यामुळे बऱ्याच गोष्टींचा पुरावा मिळतो. त्या सर्व तंत्रज्ञानाचा वापर व्हावा. शिक्षा कायदेशीर रित्या दिली जावी हीच अपेक्षा! तूर्तास इतकेच!

**जयंत माईनकर**

# भाजपची राजस्थान पॅटर्नने कल चाचपणी, कुणाचा होणार भाग्योदय

## लिफाफे घेऊन पक्ष निरीक्षक रवाना, तीन मतदारसंघाचा घेतला आढावा

**गोंदिया:** विधानसभा निवडणुकांचा बिगुल लवकरच वाजणार आहे. त्यापुर्वी आता सर्वच राजकीय पक्षांनी उमेदवारांची यादी फायनल करण्याची प्रक्रिया सुरु केली आहे. कोणत्या मतदारसंघातून कोणता उमेदवार सक्षम ठरू शकतो. यासाठी प्रयमच भाजपने राजस्थान पॅटर्नचा अवलंब करीत तीन प्रमुख उमेदवारांना आपला पसंती क्रम देऊन गुप्त मतदान घेण्यात आले. यात भाजपचे प्रमुख पदाधिकारी, जि.प., पं.स.सदस्य, महामंत्री, जेष्ठ नेते यांनी मतदान केल. यातील निष्कर्षावरून उमेदवार निश्चित होणार असल्याने कुणाचा भाग्योदय होते, याकडे नजरा लागल्या आहेत.

जिल्ह्यातील गोंदिया, तिरोडा आणि आमगाव या तीन मतदारसंघातील कल जाणून घेण्यासाठी भाजपचे माजी आ. अनिल सोले, गिरीष व्यास, बाळा काशीवार हे मंगळवारी (दि.१) गोंदिया जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले होते. या तिघांनीही स्वतंत्रपणे तीन मतदारसंघात जाऊन विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने आढावा घेतला. तसेच स्थानिक नेते, पदाधिकारी आणि प्रमुख कार्यकर्त्यांच्या काय भावना आहेत त्या जाणून घेतल्या. यानंतर तिन्ही मतदारसंघातील प्रमुख पदाधिकारी, नेते सदस्यांचे यांचे गुप्त मतदान घेण्यात आले. संबंधितांना त्यांच्या मतदारसंघातील तीन सक्षम उमेदवारांची नावे लिहून त्याला पसंतीनुसार १,२,३ असा क्रम



द्यायचा होता. त्यानंतर त्यांनी केलेलञया मतदानाची चिठ्ठी लिफाफा बंद करुन बॉक्समध्ये पक्ष निरीक्षाकांसमोर उभा करण्यात आला. या लिफाफ्यात नेहमी कुणाची नावे आहेत हे पक्ष निरीक्षकांना सुद्धा माहिती नसून हे लिफाफे पक्ष निरीक्षक मुंबईला प्रदेश कार्यालयाकडे पाठविणार असल्याची माहिती आहे. गोंदिया विधानसभेसाठी १०४, तिरोडा विधानसभेसाठी ११६ आणि देवरी विधानसभेसाठी २०५ पदाधिकाऱ्यांनी मतदान करुन आपला कल दिला आहे. उमेदवार ठरविण्यासाठी प्रथमच अशा प्रकारची प्रक्रिया राबविण्यात आली ही भाजपचे केंद्रीय मंत्री भुपेंद्र यादव यांची संकल्प असल्याचे भाजपच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

### लिफाफे उघडणार आता मुंबईत

**गोंदिया जिल्ह्यातील तीन मतदारसंघातील उमेदवार ठरविण्यासाठी पदाधिकाऱ्यांचा गुप्त मतदान पद्धतीने कल जाणून घेण्यात आला. हे बंद लिफाफे घेऊन पक्ष निरीक्षक रवाना झाले. हे लिफाफे आता भाजपच्या मुंबई प्रदेश कार्यालयात पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांसमोर उघडण्यात येणार आहेत. त्यानंतर या मतदानातील निष्कर्षावरुन उमेदवार ठरविला जाणार असल्याची माहिती आहे.**

### सर्वाधिक स्पर्धा आमगाव मतदारसंघात

**भाजपच्या पक्ष निरीक्षकांनी मंगळवारी गोंदिया, आमगाव, तिरोडा या तिन्ही विधानसभा मतदारसंघाचा आढावा घेतला. यात देवरी मतदारसंघातून लढण्यास इच्छुक असणाऱ्यांची संख्या सर्वाधिक होती. या मतदारसंघातून माजी आ. संजय पुराम, श्रीकांत राणा, हनुमंत वट्टी, शंकर मडावी, अर्चना मडावी, देवराज वडगाये, विरेंद्र उईके यांची नावे पुढे आली. तर गोंदिया विधानसभा मतदारसंघातून पंकज रहांगडाले, संजय टेंभरे, दिनेश दादरीवाल, नेतराम कटरे, डॉ. प्रशांत कटरे व तिरोडा मतदारसंघातून आ. विजय रहांगडाले, पंकज रहांगडाले, माजी आ. हेमंत पटले, ओम कटरे, प्रा. धमेंद्र तुरकर या इच्छुकांची नावे समोर आल्याची माहिती आहे.**

# ओबीसी प्रीमॅट्रिक शिष्यवृत्तीचा १६ कोटींहून अधिकचा निधी परत का गेला?

**ओबीसी मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्तीची नेमकी काय स्थिती आहे, त्याबाबत माहिती घ्यावी लागेल.**

**- अतुल सावे,**
**मंत्री, इतर मागास बहुजन कल्याण विभाग.**

**मी या विभागात नव्याने रूजू झाल्याने याविषयी माहिती नाही. काही तांत्रिक कारणांमुळे एखाद्या जिल्ह्यातील शिष्यवृत्ती प्रलंबित असू शकते.**

**- चित्रकला सूर्यवंशी,**
**उपसचिव, इतर मागास बहुजन कल्याण विभाग.**

**नागपूर :** २०२३-२४ या शैक्षणिक सत्रात ओबीसी, व्हीजेएनटी आणि एसबीसी प्रवर्गातील पहिली ते दहावीतील विद्यार्थ्यांच्या मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्तीसाठीचा १६ कोटींहून अधिकचा निधी परत गेला (व्यपगत) आहे. शासकीय योजनेच्या अंमलबजावणीबाबत अधिकारी उदासीन असल्याने हा निधी परत गेल्याचा आरोप आता होत आहे.




इतर मागासवर्ग प्रवर्गातील गरीब कुटुंबातील अनेक मुलांना पालकांच्या पारंपरिक व्यवसायामध्ये मदत करावी लागते. ही मुले शाळेत नियमित जाऊ शकत नाहीत. अशा मुलांपर्यंत शिक्षण पोहोचवण्यासाठी केंद्र सरकारने १९९८-९९ साली मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती योजना सुरू केली. त्यानंतर राज्यात २०१९-२० पासून ही योजना लागू करण्यात आली.

ज्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न अडीच लाख रुपये आहे, अशा पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांना प्रतिमहिना १०० रुपये आणि तिसरी ते दहावीच्या निवासी विद्यार्थ्यांना प्रतिमहिना ५०० रुपये शिष्यवृत्ती दिली जाते. परंतु, २०२३-२४ या शैक्षणिक सत्रात भंडारा, अहमदनगर, पुणे, कोल्हापूर, जळगाव, बुलढाणा, वाशीम, परभणी, चंद्रपूर, वर्धा, लातूर या दहा जिल्ह्यातील एकूण १६ कोटी २७ लाख ६४ हजार रुपये अखर्चित राहिले. यात केंद्र व राज्य सरकारचे प्रत्येकी आठ कोटी आहेत.

ओबीसी मंत्रालयाकडे स्वत:ची यंत्रणा नसल्याने जिल्हा परिषदेतील समाज कल्याण अधिका?यांच्या माफर्फत ही योजना राबवण्यात येते. जिल्हा परिषदेत देखील पुरेसे मनुष्यबळ नसल्याने इतर विभागाची मदत घेतली जाते. हे अतिरिक्त काम समजून संबंधित विभागाचे अधिकारी याकडे कानाडोळा करतात. त्यामुळे या शिष्यवृत्ती योजनेचा लाभ रीब विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचत नसल्याचे चित्र आहे.

### बोरी/ सावरी परिसरातील युवकांचा राष्ट्रवादी अजीत पवार गटात प्रवेश

**अर्जुनी मोरगाव :** विधानसभा अंतर्गत अर्जुनी मोर तालुक्यातील बोरी / सावरी येथील शेकडो युवकांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे वरिष्ठ नेते प्रफुल्ल पटेल व राजेंद्र जैन यांचे कार्यप्रणालीवर विश्वास ठेवुन तथा राष्ट्रवादी अजीत पवार गटाचे अर्जुनी मोर.विधानसभा क्षेत्राचे युवा नेते तथा युथ चे आयकॉन दानेश साखरे यांचे कार्यकर्तृत्वावर विश्वास ठेवुन ता.३० सप्टेंबर ला शेकडो युवकांनी राष्ट्रवादी काँग्रेस अजीत पवार गटात प्रवेश केला.

तालुक्यातील बोरी/ सावरी येथे क्रिडास्पर्धेच्या समारोपीय कार्यक्रमाचे औचित्य साधुन हा पक्ष प्रवेसाचा कार्यक्रम घेण्यात आला.राष्ट्रवादी कांग्रेस चे युवा नेते दानेश साखरे युवकांना मार्गदर्शन करतांना म्हणाले की सध्या युवकच देशाचे आधारस्तंभ आहेत. आपल्याला अर्जुनी मोर.विधानससभा क्षेत्रातुन संधी मिळाल्यास संधीचे सोने करुन युवकांसाठी मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी कशा उपलब्ध करुन देता येतील यासाठी आपले प्रयत्न राहणार आहेत. या भागातील युवकांनी उच्च शिक्षणाकडे लक्ष केंद्रित करुन शिक्षणाचा फायदा लहान मोठ्या नोक-यासोबतच तंत्रशुध्द शेती,विवीध व्यवसाय करुन आत्मनिर्भर बनुन आपली प्रगती साधण्याचे आवाहन केले.

# भारतीय संविधानाने देशाला स्थैर्य दिले-इंजि. यशवंत गणवीर



**गोंदिया :** भारतीय संविधानाने देशाला स्थैर्य प्रदान केले आहे. स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या चतुसूत्रीवर आधारित संविधानाला बदलविता येत नाही. संविधान बदलविणे ही केवळ अफवा असून राजकिय स्वार्थासाठी संविधान बदलविण्यात येणार असल्याची भाषा करण्यात येत असल्याचे मत जिल्हा परिषद गोंदियाचे उपाध्यक्ष तथा शिक्षण व आरोग्य समितीचे सभापती इंजि. यशवंत गणवीर यांनी व्यक्त केले.

इंग्रजांच्या काळातच कॅबिनेट मिशन प्लॉन अंतर्गत १९४६ मध्ये संविधान सभेची निर्मीती करण्यात आली. संविधान सभेत ३८९ सभासद होते. या समितीचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद होते. तर मसूदा समितीचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर होते. ९ डिसेंबर १९४६ रोजी संविधान सभेची प्रथम बैठक झाली. त्याबैठकीत संविधानाचा हेतू ठरवून त्याप्रमाणे संविधान निर्मीतीचे कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केले. कोणताही मसूदा तयार केल्यानंतर संविधान सभेत त्यावर सखोल चर्चा होवून नंतर त्याला मान्यता प्रदान करण्यात येत असे. संविधानात कळानूरूप बदल करण्याची तरतूद करण्यात आली आहे. मात्र, संविधानाच्या मुलभूत ढाच्यातमध्ये कोणताही बदल करता येत नाही. त्यामुळे संविधान बदलण्याची भाषा करणारे व्यक्ती राजकीय स्वार्थ साधन्यासाठी अफवा उडवित आहेत. खऱ्या अर्थाचे संविधान नव्हे: तर संविधान बदलविण्याची भाषा करणारे स्वार्थी राजकारणी धोक्यात आल्यामुळे ते अपप्रचार करीत असल्याचे मतही श्री. यशवंत गणवीर यांनी व्यक्त केले. माजी केंद्रीय मंत्री प्रफ्फुल्ल पटेल यांनी नागपूर विमानतळाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव दिले. एवढेच नव्हे; तर गोंदियाच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव देण्यासाठी आंदोलन करून थेट डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नावाचे नामफलक वैद्यकीय महाविद्यालय परिसरात लावले. प्रफुल्लभाई पटेल आणि राजेंद्र जैन यांच्या नेतृत्वात जिल्हयात विकासकामे मोठयाप्रमणात होत असून नागरीकांनी सविधान बदलाच्या अफवांना बळी पडू नये. असेही श्री. यशवंत गणवीर म्हणाले.

**मुख्यमंत्री लाडकी बहीण हा तर सन्मान**

महाराष्ट्र शासनाने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सूरू केली. महिलांना त्यांच्या खात्यात थेट सन्मान निधी दिल्यामुळे अनेक महिलांचे संसार फुलू लागले. गावातील सर्वसामान्य महिलांना मुख्यमंत्र्यांची बहीण असल्याचा अभिमान आहे. भारतीय संस्कृतीत बहीणीला मानाचे स्थान आहे. तिचा अधिकार कुणीही हिरावू शकत नाही. मात्र, बहीणाला निधी मिळत असल्यामुळे विरोधकांच्या पोटात दुखायला लागले. विरोधकांकडे मुद्दे नसल्यामुळेच मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना बंद पडेल, असा अपप्रचार विरोधकांनी सुरू केला आहे.? शासनाने सुरू केलेली ही योजना कधीही बंद पडणार नाही. त्यामुळे महिलांनी या अपप्रचाराला बळी पडू नये. असे आवाहनही इंजि. यशवंत गणवीर यांनी केले.

## पक्षात कार्यकर्त्यांचा प्रवेश म्हणजे, निवडणुकीत भाजपच्या विजयाची नांदी : माजीमंत्री बडोले

**अर्जुनी मोरगाव:** विविध संघटना व पक्षांचे कार्यकर्ते, नेते हे भारतीय जनता पार्टीच्या कार्यप्रणालीवर विश्वास ठेवून प्रवेश करीत आहेत. हे निश्चितच आगामी विधानसभा निवडणुकीतील विजयाची नांदी असल्याचे संकेत आहे आणि निशिचतच यात आपल्या सर्वांच्या सहकार्याने यश मिळू शकेल, अशी खात्री माजी सामाजिक न्यायमंत्री राजकुमार बडोले यांनी व्यक्त




केली.आगामी विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अर्जुनी मोरगाव क्षेत्रातील अनेक काँग्रेस कार्यकर्त्यांनी माजी सामाजिक न्यायमंत्री राजकुमार बडोले यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला. यावेळी ते बोलत होते. प्रसंगी त्यांनी भाजपात प्रवेश करर्णा?या घनशेक सय्याम, किशोर शेंडे, शेखर मरस्कोल्हे, अमित मडावी, नीताराम कोरे, भुपेंद्र मेश्राम, दिनेश कापगते, नेपाल कापगते आदी कार्यकर्त्यांचे पक्षाचे दुपट्टे देऊन स्वागत केले. याप्रसंगी अर्जुनी मोरगाव विधानसभा क्षेत्रातील भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### प्रधानमंत्री सूर्यघर मोफ्फत वीज योजनेला नागपूरमध्ये सर्वाधिक प्रतिसाद

**नागपूर:-** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुरू केलेल्या प्रधानमंत्री सूर्यघर मोफ्फत वीज योजनेला नागपूर शहर व जिल्ह्यात उत्तम प्रतिसाद मिळाला असून आतापर्यंत ८,११७ वीज ग्राहकांनी या योजनेचा लाभ घेतला असून त्यांची स्थापित क्षमता ३३.३२ मेगावॅट आहे तर त्यांना ५३ कोटी रुपये अनुदान मंजूर झाले आहे. याखेरीज शहर व जिल्ह्यातील २१,८७३ अर्ज प्राप्त झाले असून त्यावर काम चालू आहे.

## जिल्हा औषध विक्रेता संघाच्या अध्यक्षपदी उत्पल शर्मा

**गोंदिया:** जिल्हा औषधी विक्रेता संघाच्या पुढील तीन वर्षाच्या कार्यकारिणी गठीत करण्यातसाठी नुकतीच निवडणूक प्रक्रिया पूर्ण झाली. या निवडणुकीत उत्पल नीलकमल शर्मा यांची सलग चौथ्यांदा अध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली.

देशातील औषध व्यवसाय क्षेत्रातील प्रतिष्ठीत संघटन असलेल्या ऑल इंडिया केमिस्ट, ॲड ड्रगिस्ट असोसिएशनच्या गोंदिया जिल्हा संघटनेत जिल्ह्यात घाऊक व किरकोळ औषध विक्रेत्यांसह एकूण ५५८ मतदार आहेत. मात्र परस्पर समन्वयातून बिनविरोध निवडणुका घेण्यचा या संघटनेचा नेहमीच प्रयत्न असते. ते यावेळीही यशस्वी झाला. यावेळीही उत्पल शर्मा यांचा आतापर्यंतचा यशस्वी कार्यकाळ आणि त्यांच्या नेतृत्व क्षमतेमुळे त्यांच्या नावाची सुरुवातीपासूनच चर्चा राहिली.

नविन कार्यकारिणी गठीत करण्यासाठी निवडणूक प्रक्रिया १५ सप्टेंबरपासून सुरु होऊन २१ सप्टेंबर पूर्ण झाले. मुख्य निवडणूक अधिकारी म्हणून एमएससीडीएचे प्रतिनिधी मदन पाटील आणि निवडणूक अधिकारी म्हणून रामसिंग भारद्वाज आणि आशिष अग्रवाल यांनी ही प्रक्रिया पूर्ण केली.

नामनिर्देशन झाल्यानंतर विरोधात कोणाचेही नाव न आल्याने सर्व उमेदवारांची बिनविरोध निवड झाल्याचे घोषित करण्यात आले. निवडणुकीत



उत्पल शर्मा यांची अध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली. तर राजेश अग्रवाल यांची उपाध्यक्ष पदी, रुपेश रहांगडाले सचिव, प्रकाश वंजारी सहसचिव, सुनील गंगवानी कोषाध्यक्ष, अमोल मेश्राम संघटन सचिव आणि सुसनजित शहा यांची टीआरसी कन्वेणर म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. नवीन कार्यकारिणीच्या सर्व सदस्यांचे जिल्ह्यातील सर्व औषध विक्रेत्यांनी अभिनंदन केले आहे.

# राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांचा विविध घटकांशी संवाद

**भंडारा:** राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी आज आपल्या भंडारा जिल्हा दौऱ्यात शासकीय विश्रामगृह येथे विविध राजकीय पक्षांचे प्रमुख नेते, लोकप्रतिनिधी, वरिष्ठ प्रशासकीय अधिकाऱ्यांशी जिल्ह्यातील विविध विकास विषयक प्रश्नांवर चर्चा केली. तसेच उद्योग, संस्कृती, पर्यटन आणि प्रमुख उत्पादनाबाबत विविध समाज घटकांशी संवाद साधून त्यांच्या विकास विषयक अपेक्षा, समस्या व संकल्पना जाणून घेतल्या.

यावेळी जिल्हाधिका-यांनी जिल्हयातील विविध योजनांचे सादरीकरण केले.या बैठकीला प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. यावेळी बैठकीत जिल्हयाचा ऐतिहासीक-सांस्कृतीक, भौगोलीक स्थिती व उदयोग व जिल्हा विकास आराखडयानुसार विकासाचे नियोजनाचे सादरीकरण जिल्हाधिका-यांनी केले.

राज्यपाल यांच्याशी चर्चा करण्यासाठी जिल्हयातील खासदार, विधान परिषद सदस्य, विधानसभा सदस्य, वरिष्ठ संपादक, औदयोगिक संघटनाचे प्रतिनीधी, आदिवासी समुदायाचे प्रतिनीधी, उमेद व अंगणवाडी महिला प्रतिनीधी, राजकीय पक्षाचे प्रतिनीधी यांचेशी संवाद साधला. यावेळी प्रभारी विभागीय आयुक्त विपीन इटनकर, जिल्हाधिकारी डॉ.संजय कोलते, जिल्हा पोलीस अधिक्षक नुरूल हसन आदि उपस्थित होते.


स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,शिवनगर गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ८०८०८१५३२९ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)


# ग्रामपंचायत अधिकारी युनियनचे वार्षिक अधिवेशन व पतसंस्थेची आमसभा उत्साहात

**गोंदिया :** जिल्ह्यातील ग्रामपंचायत अधिकारी यांचे वार्षिक अधिवेशन व पतसंस्थाची आमसभा मयूर लान कटंगी कला येथे २९ सप्टेंबरला जि.प. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मुरगानंथम यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी ग्रामपंचायत अधिकारी संघटनेच्या डायरीचे विमोचन मुकाअ मुरगानंथन, उपमुकाअ गोविंद खामकर, आनंद पिंगळे, जिल्हाध्यक्ष कमलेश बिसेन यांच्या हस्ते करण्यात आली. तसेच पदोन्नतीप्राप्त ग्रामपंचायत अधिकाऱ्यांचे सत्कार सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थानी मुख्य कार्यकारी अधिकारी मुरगानंथम तर प्रमुख अतिथि उप मुख्य कार्यकारी अधिकारी गोविंद खामकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी आनंद पिंगळे, जिल्हाध्यक्ष कमलेश बिसेन, कार्तिक चव्हाण उपस्थित होते. कार्यक्रमात प्रास्ताविकेतून जिल्हाध्यक्ष कमलेश बिसेन यांनी ग्रामपंचायत अधिकारी यांची विपरीत परिस्थितिमध्ये ही काम करण्याची कार्यकुशलता व होणाऱ्या स्वार्थ साध्य न झाले मुळे खोट्या तक्रारी बाबत वस्तुस्थितीशी अवगत करवून भविष्यात लोकाभिमुक कामे करण्याची साडे तीनशे लोकांकडून ग्वाही दिली .यावेळी उप मुख्य कार्यकारी अधिकारी गोविंद खामकर यांनी आपल्या कार्यकाळात आलेले अनुभव त्यात ग्रामपंचायत अधिकारी यांच्या कामात स्मार्ट वर्क करण्याची गरज प्रतिपादित केली. त्यांनंतर ग्रामपंचायत अधिकारी पतसंस्था ची आमसभा जिल्हाध्यक्ष कमलेश बिसेन यांनी अहवाल वाचन करून चर्चा केली. त्यात अनेक धोरणात्मक निर्णय घेण्यात आली त्यात सामाजिक उत्तरदायित्व जपणारा निर्णय म्हणून सर्व सम्मती ने सभासद कल्याण निधि अंतर्गत मृत्यू पश्चात परिवाराला कंत्राटी ग्रामपंचायत अधिकारी, यांना २ लक्ष, तर एनपीएस धारक दीड लक्ष ,ओपीएस धारक १ लक्ष देण्याचे निश्चित करण्यात आले. तर गंभीर आजारी सभासद यांना १ लक्ष ना परतावा मदत करण्याचे निर्णय घेण्यात आले. संचालन कुलदीप कापगते यांनी तर प्रास्ताविक कमलेश बिसेन व आभार शैलेश परिहार यांनी मानले.




ग्रामपंचायत अधिकारी यांचे वार्षिक अधिवेशन व पतसंस्थाची आमसभा घेण्यात आली. यावेळी महाराष्ट्र राज्य ग्रामसेवक युनियन जिल्हाध्यक्ष कमलेश बिसेन,सचिव कुलदिप कपगते, उपाध्यक्ष.सचिन कुथे, महिला उपाध्यक्ष भारती वाघमारे, कोषाध्यक्ष शैलेश परिहार, सहसचिव योगेश रुद्रकार, राज्य कौन्सिलर योगराज बिसेन, महिला राज्य कौन्सिलर सौ.रजनी शहारे , प्रसिद्धी प्रमुख रामेश्वर जमईवार , जिल्हा संघटक रितेश शहारे, जिल्हा संघटक सुरेश वाघमारे, जिल्हा संघटक टिकाराम जनबंधु, कायदे सल्लागार प्रदीप ठाकरे, कायदे सल्लागार किशोर आचले, जिल्हा निमंत्रक नरेंद्र गोमाशे, जिल्हा महिला निमंत्रक कु.नम्रता रंगारी, संघटनेचे उपाध्यक्ष दयानंद फटिंग, कोषाध्यक्ष भागेश्वर चौव्हान, संचालक रामेश्वर जमईवार, सचिन कुथे, सुनील पटले, रविंद्र अंबादे, ओमेश्वर बिसेन, निशा टेंभरे, तारेश कुबडे , नरेंद्र अतकरी, कु.ज्योती बिसेन, गायककुमार ठाकुर , निशीकांत मेश्राम ओमेश्वर बिसेन संदीप मेंढे, ओमेश्वर कापगते, पवनकुमार हातझाडे , तारेश कुबडे, रविंद्र अंबादे, शिवाजी राठोड , राजेश रामटेके, विजय बिसेन, कु.सरीता ब्रम्हवंशी , शैलेश परिहार , सुमेद बंसोड यासह ३००च्या जवळपास ग्रा.पं. अधिकारी उपस्थित होते.

# ओबीसी विभागात ८७० कंत्राटी पदांची भरती




**नागपूर :** इतर मागास बहुजन कल्याण विभागाची आस्थापना, क्षेत्रीय कार्यालये, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती) आणि इतर मागासवर्गीयांच्या वसतिगृहांसाठी बाह्यस्त्रोताद्वारे मनुष्यबळ पुरवठा करणाऱ्या सेवापुरवठादार कंपनीची निवड करण्यात आली आहे. या माध्यमातून ओबीसी विभागात ८७० कंत्राटी पदांची भरती होणार आहे. विशेष म्हणजे, राज्य शासनाने कंत्राटी भरती करणार नाही असे जाहीर केले असतानाही विविध विभागात सेवापुरवठादार कंपनीमार्फत कंत्राटी भरती सुरूच असल्याचे चित्र आहे.

कामगार विभागाच्या १४ मार्च २०२३ रोजीच्या निर्णयाद्वारे सर्व शासकीय, निमशासकीय संस्था, महामंडळांमध्ये आवश्यक कर्मचाऱ्यांची कंत्राटी भरती सुरू झाली होती. त्यासाठी नऊ संस्थांची नियुक्ती करण्यात आली होती. मात्र, हा निर्णय केवळ मंत्रालय किंवा शासकीय विभागापुरता मर्यादित न ठेवता सरकारने त्याची व्याप्ती थेट महापालिका, नगरपालिका, महामंडळांपर्यंत वाढवल्याने विद्यार्थी संघटना आणि राजकीय पक्षांनी आंदोलन उभारले. यामुळे हे "पाप" आघाडी सरकारचे असल्याचा आरोप करीत कंत्राटी भरतीचा निर्णय रद्द करण्याची घोषणा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी २० ऑक्टोबर २०२३ रोजी केली.

३१ ऑक्टोबरला कंत्राटी भरती रद्द केल्याचा निर्णय जाहीर झाला. मात्र, केवळ पुरवठादार नऊ संस्थांचेच कंत्राट रद्द करण्यात आले असून शासनाच्या विविध विभागांमध्ये कंत्राटी भरती सुरूच असल्याचे चित्र आहे.

### तीन वर्षे नियमित पदभरती नाही?

**ओबीसी विभागाच्या शासन निर्णयानुसार, सेवापुरवठादार कंपनीच्या कार्यादेशाच्या दिनांकापासून पुढील ३ वर्षांपर्यंत किंवा याबाबत पुढील आदेश येईपर्यंत बाह्ययंत्रणेद्वारे मनुष्यबळ पुरवठा करता येणार आहे. त्यामुळे पुढील तीन वर्षे नियमित पदभरतीची शक्यता धुसर असल्याचे मत व्यक्त केले जात आहे. विविध आस्थापनांमध्ये मनुष्यबळ उपलब्ध व्हावे यासाठी बाह्ययंत्रणेमार्फत सेवापुरवठादार संस्थेची निवड करण्यात आली आहे.**

**– दिनेश चव्हाण, उपसचिव, इतर मागास बहुजन कल्याण विभाग**

इतर बहुजन कल्याण विभागाच्या आस्थापनेतील विविध विभागांसाठी सुधारित आकृतिबंध तयार करण्यात आला आहे. त्यानुसार बाह्ययंत्रणेद्वारे विविध संवर्गाची ८७० पदे भरण्यात येणार आहेत.

यासाठी एस-२ इन्फ्राटेक इंटरनॅशनल लि.फ या सेवापुरवठादार कंपनीची निवड करण्यात आली आहे. कंत्राटी भरतीमुळे पुन्हा राज्यातील वातावरण तापण्याची शक्यता आहे. कंत्राटी भरतीमध्ये मागासवर्गीय समाजाला आरक्षण मिळणार नसल्याने विविध ओबीसी संघटनांनी यास विरोध केला आहे.

# येत्या विधानसभा निवडणूकीत समन्वयाने कार्य करुन पक्षात उत्साह ठेवा-खासदार प्रफुल पटेल




**गोंदिया:–** आगामी विधानसभा निवडणुकीमध्ये महायुतीत समन्वयाने कार्य करायचे असून पक्षात उत्साह व उमंग ठेवा नैराश्याने पक्ष पुढे जात नाही.मी सदैव आपल्या पाठीशी खंबीर उभा असल्याची ग्वाही पक्ष पदाधिकारी व कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करतांना खासदार प्रफुलभाई पटेल यांनी दिली.ते नमाद महाविद्यालयाच्या सभागृहात आयोजित तालुका व शहर राष्ट्रवादी काँग्रेस कार्यकर्ता बैठकीत बोलत होते.

खासदार प्रफुल पटेल पुढे म्हणाले कि, संपूर्ण राजकीय जिवनात गोंदिया व भंडारा जिल्ह्याची जिम्मेदारी सांभाळतांना सामाजिक प्रश्न सोडविले आहेत. जनतेचा उत्साह व विश्वसनीयता पाहून लोक आत्मीयतेने जुळलेले आहेत हाच उत्साह व उमंग कायम राहू द्या. आगामी निवडणुकीत समन्वय करून महायुतीचा निर्णय घेतला जाईल. आपण सत्तेत आहो व पुढेही राहू विरोधकांनी पसरवलेल्या भ्रमात राहू नका, पक्षाने फुले, शाहू, आंबेडकर विचारधारा सोडलेली नाही. आम्ही माता- भगिनीच्या स्वावलंबन व आत्मनिर्भर बनाण्याकरिता लाडली बहीण योजना, शेतकऱ्यांसाठी मोफत वीज, शेतकऱ्यांना बोनस असे जन हिताचे कार्य केले आहे.

यावेळी माजी आमदार राजेंद्र जैन, प्रेमकुमार रहांगडाले, नरेश माहेश्वरी, विनोद हरिणखेडे, राजलक्ष्मी तुरकर, सुरेश हर्षे, जनकराज गुप्ता, हुकूम अग्रवाल, बाळकृष्ण पटले, कुंदनभाऊ कटारे, पूजा अखिलेश सेठ, केतन तुरकर, गणेश बरडे, रफिक्क खान, योगेंद्र भगत, रवीकुमार पटले, नानू मुदलियार, माधुरी नासरे, जगदीश बहेकार, अशोक सहारे, चुन्नीलाल बेंद्रे, नीरज उपवंशी, अश्विनी पटले, सरला चिखलोंडे, राजेश जमरे, शिवलाल जमरे, शंकरलाल टेम्भरे, अहमद भाई, आशा पाटील, कीर्ती पटले, बिरजूला भेलावे, खालिदभाई पठाण, सुनील भालेराव, सचिन शेंडे, भगत ठकरानी, घनश्याम मस्करे, प्रियाताई हरिणखेडे, किरण पारधी, मनोज डोंगरे, रमेश गौतम, सविता मुदलियार, कुंदा पंचबुद्धे, मालती कापसे, विनीत सहारे, विनोद पंधरे, विजय रगडे, पिंटू बनकर, अनुज जायस्वाल, नितिन टेम्भरे, करण टेकाम, निशिकांत बन्सोड, छोटू पंचबुद्धे, श्याम चौरे, सुनील पटले, शैलेश वासनिक, सहित गोंदिया ग्रामीण व शहर कार्यकर्ता मोठ्या संख्येत उपस्थित होते.

# आता ग्रामसेवक नव्हे ग्रामपंचायत अधिकारी पाहणार ग्रामपंचायतचा कामकाज



**गोंदिया:–** ग्रामपंचायत सचिव म्हणून जिल्हा परिषद वर्ग तीन तांत्रिक वर्ग एक ग्रामसेवक ग्राम विकास अधिकारी हे ग्राम पंचायत सचिव म्हणून काम पाहत होते. मात्र गेली अनेक दिवसापासून ग्रामसेवक व ग्रामविकास अधिकारी हे दोन्ही पद एकत्र करून एकच पद निर्माण करण्याच शासनाच्या विचाराधीन होते.त्याप्रमाणे हे दोन्ही पदे रद्द करून त्याऐवजी ग्रामपंचायत अधिकारी हे पद शासनाने तयार केले आहे. त्या संदर्भातील शासन निर्णय सुद्धा पारित करण्यात आलेला आहे, त्यामुळे आता ग्रामपंचायत मध्ये सचिव म्हणून ग्रामसेवक अथवा ग्रामविकास अधिकारी दिसणार नाही.तर आता त्याऐवजी ग्रामपंचायत अधिकारी हे पद कार्यान्वित झालेले आहे. वास्तविक ग्रामपंचायतच्या विकासाच्या कणा म्हणून ग्रामपंचायतीच्या सचिवाला पाहिले जाते.त्यामुळे हे पद गावातील सरकारी कर्मचा?यांमध्ये महत्त्वाचे पद आहे. या पदाकडे आर्थिक अधिकार सह गावातील सर्वांगीण विकासासंदर्भात मोठी जबाबदारी आहे. त्यामुळे त्यांच्या पदाची गरिमा व प्रतिष्ठा सन्मानजनक व्हावी ह्या उद्देशाने शासनाने पदनाम बदल केलेला आहे.या दोन पदांना एकत्र करून एक पद निर्माण केल्यामुळे या संवर्गावर होणारे वेतन त्रुटी संदर्भातील अन्याय ही दूर झालेले आहे. आता ग्रामपंचायतीला ह्या पदनामामुळे अधिक सक्षम अधिकारी मिळाले असून त्यामुळे ग्राम विकासाचा डोलारा अधिक वेगाने चालेल अशी अपेक्षा केली जात आहे. त्यासोबत शासनाने ग्राम पंचायत सरपंच व उपसरपंच यांच्या ही मानधनात दुप्पट वाढ केली असून त्याचाही फायदा ग्राम पंचायत कामकाजात होणार असून सरपंच ही अधिक उत्साहाने काम करतील अशीही अपेक्षा केली जात आहे.

ग्रामसेवक व पदोन्नतीने ग्राम विकास अधिकारी झाल्यावर ही कामात बदल होत नव्हता.तसेच आर्थिक लाभ ही मिळत नव्हता.त्यामुळे वेतन त्रुटी निर्माण झाली होती. ग्रामसेवक-८ मधून पहिली कालबद्ध पदोन्नती ग्राम विकास अधिकारी-१२ तर दूसरी विस्तार अधिकारी-१४ तर तिसरी सहायक गट विकास अधिकारी-१५ मिळायची.मात्र आता दोन पद एकत्र करून ग्रामपंचायत अधिकारी केल्यामुळे पहिली कालबद्ध विस्तार अधिकारी-१४ दूसरी कालबद्ध पदोन्नती सहायक गट विकास अधिकारी-१५ व तिसरी कालबद्ध पदोन्नती गट विकास अधिकारी-२० असे मिळणार असल्यामुळे गेली अनेक वर्षापासून या संवर्गाची वेतन त्रुटी दूर झाली आहे. तसेच ग्राम पंचायतचा मुख्य अधिकारी म्हणून कामे करतांना ग्रामसेवक या पदनाम मुळे अडचण निर्माण व्हायची. आता ग्रामपंचायत अधिकारी पदनाम मुळे प्रशासकीय दृष्टीने पदाची गरिमा वाढली आहे. याकरिता गेली आठ वर्षे पासून शासनाकडे युनियन मार्फत मागणी व पाठपुरावा सुरू होता शासनाने ती मागणी मंजूर केल्यामुळे राज्यातील २२००० ग्राम पंचायत अधिकारी यांचे मार्फत आभार.

# फुलचूर टोल्यात श्रमदानातून स्वच्छता

**गोंदिया:–** सपूर्ण जिल्हयात स्वच्छता ही सेवा हा उपक्रम प्रभावीपणे राबविण्यात येत असून त्याअंतर्गत फ्फुलचूर टोला येथील आरटीओ कार्यालय चौकात (ता. १) श्रमदानातून स्वच्छता मोहिम राबविण्यात आली. जिल्हा परिषद गोंदियाचे मुख्य कार्यकारी अधिकारी एम मुरूगानंथम यांच्यासह ग्रामपंचायत आणि पंचायत समितीचे १५५ कर्मचाऱ्यांनी यात भाग घेवून सुमारे ३०० मिटरचा संपूर्ण परिसर स्वच्छ केला.

उपक्रमांत जिल्हा परिषद पाणी व स्वच्छता विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी आनंदराव पिंगळे यांच्यासह फ्फुलचूरटोला ग्रामपंचायतीच्या सरपंच श्रीमती उषाताई बावनकर, विस्तार अधिकारी एस. एस. निमजे, पी. एम. गावड, जयंत तिडके, एल. पी. चिंधालोरे, कृषी विस्तार अधिकारी आर. के. कटरे, डी. बी. पटले ग्रामपंचायतीचे सदस्य जीवन बन्सोड, श्याम कावळे, भारती गावंडे, कोमल धोटे, रवि बोधानी, फ्फरहा शेख, ग्रामविकास अधिकारी पी.सी. मेश्राम, मुख्याध्यापिका शालू रामटेके यावेळी उपस्थित होते.

स्वच्छता ही सेवा उपक्रम निश्चीत कालावधीसाठी असला तरी स्वच्छता कायमस्वरूपात पाळणे हे आपले आद्य कर्तव्य आहे. त्यामुळे श्रमदानातून स्वच्छता मोहिमेत सहभागी होतांना संपूर्ण स्वच्छता करण्याचा उद्देश सर्वांनी बाळगावा, असे आवाहन याप्रसंगी मार्गदर्शन करतांना मुख्य कार्यकारी अधिकारी एम. मुरूगानंथम यांनी केले. स्वच्छता ही सेवा या उपक्रमाची संपूर्ण माहिती पाणी व स्वच्छता विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी आनंदराव पिंगळे यांनी दिली. ते म्हणाले, स्वच्छता ही सेवा हा उपक्रम स्वच्छतेचे महत्व पटवून देतो. मात्र, आपले कार्य अविरत राहीले पाहीजे, आपणही घाण करू नये. आणि इतरांनाही सार्वजनिक ठिकाणात घाण करू देवू नये, याचा सर्वांनी संकल्प करण्याचे आवाहनही श्री. पिंगळे यांनी केले. दरम्यान पाणी व स्वच्छता विभागाचे माहिती, शिक्षण व संवाद तज्ञ अतुल गजभिये यांनी उपस्थितांन स्वच्छतेची शपथ दिली.

याप्रसंगी पंचायत समितीचे सर्व अधिकारी कर्मचारी, जिल्हा पाणी व स्वच्छता विभागाचे सर्व सल्लागार उपस्थित होते. दरम्यान फुलचूर नाका परिसरातील ३०० मिटरचा संपूर्ण परिसर, मुख्य मार्ग स्वच्छ करण्यात आला.

## मुलाने मद्यपी बापाला बुक्की मारून संपविले

**गोंदिया :** दारुड्या बापासोबत झालेल्या झटापटीत हातातील कडा डोक्यावर लागून बापाचा जागीच जीव गेला. तिरोडा तालुक्यातील ग्राम खैरबोडी येथे रविवारी (दि.२९) पहाटे १.३० वाजता दरम्यान ही घटना घडली.रमेश पारधी (५०, रा. खैरबोडी) असे मृताचे नाव आहे.

खैरबोडी येथील रमेश पारधी हा पत्नी चंद्रकला पारधी (४७), थोरला मुलगा आनंद पारधी (२४) व धाकडा मुलगा अंकुश पारधी (२२) यांच्यासोबत राहत होता. रमेश पारधी दारूचा व्यसनी होता व नेहमी पत्नी चंद्रकला व थोरला मुलगा आनंद यांच्यासोबत भांडण करून त्यांना मारहाण करीत होता. अनेकदा दारूच्या नशेत तुम्ही माझ्या घरातून निघून जा, असे रमेश बोलत होता. शनिवारी (दि.२८) दुपारी चंद्रकला हिच्याशी भांडण झाल्याने ती घरातून निघून गेली. तेव्हा आनंद कामानिमित्त बाहेर गेला होता. रात्री ९.३० वाजताच्या सुमारास रमेश दारू पिऊन घरी आला. तेव्हा घरात अंकुश एकटाच होता. रमेशने त्याला त्याची आई कुठे गेली असे विचारून शिवीगाळ केली व पुन्हा घरातून बाहेर गेला. त्यानंतर रात्री ११.३० वाजता रमेश पुन्हा दारू पिऊन घरी आला. त्यानंतर त्याने पुन्हा अंकुश सोबत भांडण केले. दरम्यान, थोड्या वेळानंतर आनंद घरी आला असता रमेशने त्याच्यासोबतही भांडण सुरू केले. रविवारी (दि.२९) पहाटे १.३० वाजतापर्यंत दोघांचे आपसात भांडण सुरू होते. यात रमेशने आनंद याला मतुझी आई घरातून निघून गेली. तुम्ही तिला कुठेतरी लपवून ठेवलेफ असे बोलून थापडबुक्क्यांनी मारहाण केली. त्यावर आनंदने सुद्धा रमेशला शिवीगाळ करून थापडबुक्क्यांनी मारहाण केली.

# व्याज अन् विलंब आकार माफ होणार, थकबाकीमुक्ती संधीला उरले ६८ दिवस



**गोंदिया:** कायमस्वरुपी वीजपुरवठा खंडित असलेल्या ग्राहकांना केवळ मूळ थकबाकीची रक्कम एकरकमी किंवा सहा हप्त्यांत भरणा करुन थकबाकीमुक्ती व पुर्नवीजजोडणीची संधी महावितरणच्या अभय योजनेतून उपलब्ध झाली आहे. संपूर्ण व्याज व विलंब आकार १०० टक्के माफ होणाऱ्या या योजनेचा जिल्ह्यातील ग्राहक लाभ घेत आहेत. वीजबिलांच्या थकबाकीमुळे ३१ मार्च २०२४ पर्यंत कायमस्वरुपी वीजपुरवठा खंडित झालेल्या ग्राहकांसाठी महावितरण अभय योजना ९१ दिवसांसाठी म्हणजे १ सप्टेंबर ते ३० नोव्हेंरपर्यंत राबवत आहे. आता या योजनेच्या कालावधीला ६८ दिवस शिल्लक आहेत.

कृषी व सार्वजनिक पाणीपुरवठा योजना वगळून उर्वरित घरगुती, वाणिज्यिक, औद्योगिक व इतर वीज ग्राहकांसाठी ही योजना आहे. तसेच मुळ थकबाकीचा एकरकमी भरणा केल्यास त्यात लघुदाब ग्राहकांना आणखी १० टक्के, तर उच्चदाब ग्राहकांना ५ टक्के सुट मिळत आहे. किंवा मूळ थकबाकीची सुरुवातीला ३० टक्के रक्कम भरुन उर्वरित ७० टक्के रक्कम व्याजमुक्त सहा हप्त्यांत भरण्याचीदेखील सोय आहे.

येत्या ३० नोव्हेंबरपर्यंत ही योजना राबविली जाणार असून यासाठी आता ६८ दिवसांचा कालावधी शिल्लक आहे. अशात थकबाकी असलेल्या वीज ग्राहकांनी या योजनेचा लाभ घेऊन वीज जोडणी करुन घ्यावी व योजनेचा लाभ घ्यावा, असे कार्यकारी अभियंता शैलेश कांबळे यांनी कळविले आहे.

### मागणीनुसार नवीन वीज जोडणीचा लाभ

**वीजबिलांची थकबाकी असलेल्या एखाद्या जागेची मालकी बदलल्यानंतरही नवीन जागा मालक किंवा ताबेदार यांना थकबाकीची रक्कम भरावी लागेल, असा निकाल सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. त्यामुळे जागा वापरात असो किंवा नसो, वीजबिलांच्या थकबाकीमधून मुक्त होण्याची संधी महावितरणकडून देण्यात आली आहे. तसेच वीज ग्राहकांना मागणीनुसार नवीन वीज जोडणी देण्यात येत आहे.**

### २०,४१० ग्राहक पात्र

**जिल्ह्यात या योजनेंतर्गत २० हजार ४१० वीज ग्राहक पात्र अहेत. त्यांच्यावर १२ कोटी ७७ लाख रुपये एवढी मूळ थकबाकी आहे. तर त्यावर एक कोटी ९८ लाख रुपये व्जाज आणि विलंब आकार आहे. या ग्राहकांना योजनेचा लाभ घेऊन थकबाकीमुक्त होण्याची चांगली संधी आहे.**

# भारतीय संस्कृतीत जेष्ठ नागरिकांना आदराचे स्थान-माजी आमदार राजेंद्र जैन



**गोंदिया:–** भारतीय संस्कृतीमध्ये जेष्ठ नागरिकांना आदराचे स्थान आहे. त्यांच्या हिताची व सन्मानाची काळजी घेणे हे आपले सामाजिक कर्तव्य आहे. भविष्यात ज्येष्ठांचे अनुभव व मार्गदर्शन नेहमी आम्हाला लाभत राहील, या दिनानिमित्त ज्येष्ठ नागरिकांप्रती आदर व्यक्त करुन माजी आमदार राजेंद्र जैन यांनी ज्येष्ठ नागरिकांना पुढील आयुष्याच्या व निरोगी जीवनाच्या शुभेच्छा दिल्या.

गोंदिया स्थित बापट लॉन, कन्हारटोली येथे जागतिक जेष्ठ नागरिक दिनानिमित्त, गोंदिया जिल्हा ज्येष्ठ नागरिक सेवा संघ गोंदियाच्या वतीने सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे दिप प्रज्वलन माजी आमदार राजेंद्र जैन यांच्या हस्ते करण्यात आले. ज्येष्ठ नागरिकांच्या धावपळीच्या आयुष्यात त्यांना आनंददायी व उत्साही जिवन जगण्याच्या हेतूने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

यावेळी सर्वश्री राजेन्द्र जैन, डी यु रहांगडाले, माधुरी नासरे, दुलिचंद बुद्धे, अॅड लखनसिह कटरे, नारायण प्रसाद जमईवार, संजय कटरे, अनुप शुक्ला, दिलीप देशमुख, शरद क्षत्रिय,डी.यु.रहांगडाले मोहन कोतवाल, यांच्या सह मोठ्या संख्येने ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते.

# प्रोग्रेसिव्ह ग्रूप ऑफ़ स्कूलस मध्ये प्रश्नमंजुषा स्पर्धा



**गोंदिया:** येथील प्रोग्रेसिव्ह इंग्लिश स्कूलमध्ये आंतरशालेय प्रश्नमंजुषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये मोठ्या संख्येत विद्यार्थ्यांनी भाग घेतला.

स्पर्धेचा शुभारंभ भारत बटालियनचे कमांडंट अमोल गायकवाड, महावितरणचे कार्यकारी अभियंता आनंद जैन, जिल्हा परिषद व वित्त व लेखा अधिकारी जनार्दन खोटरे, बँक व्यवस्थापक अमित हुड, कौशल तिराले, उद्योगपती श्याम गुप्ता, गुरुकूल स्कूलचे संचालक मुरलीधर माहुरे, संस्थध्यक्ष डॉ. पंकज कटकवार, उपाध्यक्ष अल्का पंकज कटकवार, सचिव डॉ. निरज कटकवार,लिना रहांगडाले, कोषाध्यक्ष ज्योती पहिरे तथा प्राचार्य ओ.टी. रहांगडाले, कुमूदिनी तावाडे, वाय.आशा राव, मीनाक्षी महापात्रा, मृणाली माटे, कुलदीप भौतिक, विणा कावळे, क्रिष्णा चौहान, विकास पटले, सुशिला भोयर, गिरीश बाावनकुळे, राहूल रामटेके, दिव्यांशू जायास्वाल यांच्या उपस्थितीमध्ये करण्यात आले. स्पर्धेत इयत्ता आठवी ते दहावीच्या गटात तन्मय कोटांगले, पुनित पारधी, अनुश्री चौधरी यांच्या गटाने प्रथम, पुनित डाभरे, पार्थ हलमारे, विस्मय पातरीकर यांच्या गटाने द्वितीय तर गुनगुन वाधवानी, केतन पारधी, दुर्गेश कावळे यांच्या गटाने तृतीय क्रमांक पटकाविला. इळत्ता पाचवी ते सातवीच्या गटात नित्या चौधरी, जय गायधने, गौरींग माने यांच्या गटाने प्रथम, आयुषी कटरे, जयेश मेंढे, भावेश सदन यांच्या गटाने द्वितीय तर केतन भेंडारकर, देवांश बिसेन, मयंक चावला यांच्या गटाने तृतीय क्रमांक पटकाविला. यशस्वी गटांना ट्रॉफी व प्रोत्साहन पुरस्कार देऊन सम्मानित करण्यात आले.

स्पर्धेसाठी एम.जी. पटले, सुनील कटरे, रितेश येडे, दुर्गा रामटेक्कर, भुमेश्वरी गौतम, तुमेश पारधी, भानुलता लावेटी, कुनाल करंडे, हेमंत कनोजिया, तपन सतदेवे, राकेश पहिरे, आकाश कटकवार यांच्यासह सर्व शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

# माहितीचा अधिकाराचा वापर लोकहितासाठी करावा-जिल्हाधिकारी प्रजित नायर



**गोंदिया:** महसूल विभागात कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांच्यामध्ये माहिती व जनजागृती व्हावी तसेच नागरिक व प्रशासनामध्ये सुसूत्रता यावी व त्यातून लोकहिताचे कामे व्हावी, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी प्रजित नायर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ या विषयावर आयोजित तीन दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमाच्या उद्घाटनाच्या पाहिल्या दिवशी केले.

यावेळी अपर जिल्हाधिकारी घनश्याम भुगावकर, निवासी उपजिल्हाधिकारी भैय्यासाहेब बेहरे, निवडणूक उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर, उपजिल्हाधिकारी (सामान्य) मानसी पाटील व सर्व उपविभागीय अधिकारी तथा तहसीलदार प्रामुख्याने उपस्थित होते.

सदर प्रशिक्षण कार्यक्रम यशवंतराव चव्हाण विकास प्रबोधिनी, (यशदा) पुणे व जिल्हाधिकारी कार्यालय गोंदिया यांचे संयुक्त विद्यमाने जिल्हाधिकारी प्रजित नायर यांचे मार्गदर्शनाखाली जिल्हा स्तरावरील अपिलीय अधिकारी, जन माहिती अधिकारी व सहाय्यक जन माहिती अधिकारी व इतर अधिकारी, कर्मचारी यांच्या उपस्थितीत दिनांक १८ ते २० सप्टेंबर २०२४ दरम्यान जिल्हाधिकारी कार्यालय, गोंदिया येथे आयोजित करण्यात आले होते.

सदर प्रसंगी माहितीचा अधिकार प्रशिक्षण हे फक्त प्रशिक्षणाच्या दृष्टीकोनातून न पाहता प्रशिक्षणातून मिळणारे ज्ञान आत्मसात करुन त्याचा उपयोग सामान्य जनतेस वेळेत माहिती देणेस करावा, असे मनोगत निवासी उपजिल्हाधिकारी भैय्यासाहेब बेहरे यांनी या वेळेस व्यक्त केले.

सदर प्रशिक्षण कार्यक्रम राष्ट्रीय प्रशिक्षक प्रशांत चौधरी (आर.टी.आय.), अविनाश प्रभुणे, माजी सदस्य नागपूर डिस्ट्रिक्ट कंज्यूमर कोर्ट व आर.टी.आय. ट्रेनर, प्रतीक वानखेडे प्रशिक्षण व्यवस्थापक आर.टी.आय. यशदा, पुणे यांच्यामार्फ्फत करण्यात आले.

सदर प्रशिक्षण कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी नायब तहसीलदार संजय धार्मिक, देवेंद्र पोरचेट्टीवार, अ.का.सारिका बंसोड, सोनाली भोयर, पी.झेड.बिसेन, शिपाई भुमेश्वर फुंडे, मिलिन बागडे, निलेश पंधरे यांनी परिश्रम घेतले. तसेच या प्रशिक्षण कार्यक्रमात सर्व नवनियुक्त तलाठी व मंडळ अधिकारी तसेच ३०० अधिकारी व कर्मचारी यांनी प्रशिक्षणाचा लाभ घेतला.

# कवी अँड. देवेंद्र चौधरी हे इंडियन डायमंड डिग्निटी अवार्ड याने जयपूर येथे सन्मानीत



**तिरोडा:** तिरोडा येथील मराठी, हिंदी व पोवारी बोली चे सुप्रसिध्द कवी व गझलकार (साहित्यिक) अँड. देवेंद्र घनश्याम चौधरी हे जयपूर (राजस्थान) येथे इंडियन डायमंड डिग्निटी अवॉर्ड ने सन्मानित झाले. दिनांक २९ सप्टेंबर रोजी तिरोडा येथील सुप्रसिध्द कवी, गजलकार (साहित्यिक) व वकील अँड. देवेंद्र चौधरी यांचे पोवारी बोली, हिंदी भाषेतील साहित्य व सामजिक क्षेत्रातील कामगीरी बघून त्यांना "भव्या फाउंडेशन" जयपुर राजस्थान द्वारा आयोजित सुरेश ज्ञान विहार विद्यापीठ जयपूर येथील आंतरराष्ट्रीय साहित्य मैत्री संमेलनात त्यांना "इंडियन डायमंड डिग्निटी अवार्ड" याने शाल श्रीफळ, सन्मानपत्र व सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. सदर वेळी ङ्कभव्या फ्फाउंडेशनङ्क च्या डॉ. निशा माथूर यांनी अँड. देवेंद्र चौधरी यांचे बाबतीत उपस्थिताना सविस्तर परिचय देऊन करून देऊन त्यांच्या कार्याचे कौतुक केले. सदर सन्मान समारोहात देश विदेशातील विभिन्न क्षेत्रातील जवळपास १०० मान्यवर उपस्थित होते.

हे विशेष की, कवी अँड. देवेंद्र चौधरी यांना आजपर्यंत त्यांच्या साहित्य क्षेत्रातील योगदानाबद्दल अनेक आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय स्तरावर, राज्यस्तरावर अनेकदा पुरस्काराने व सन्मानाने सन्मानित करण्यात आले आहे. मागील वर्षी नेपाळ देशामध्ये आयोजित विश्व प्रतिभा आंतरराष्ट्रीय सन्मान समारोह मध्ये सन्मानीत करण्यात आले आहे. कवी अँड. देवेंद्र चौधरी यांनी मध्यप्रदेश मधील पांढुरना येथील अखिल भारतीय तिसरे पोवारी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद देखील भूषविले असून सदर सन्मान हा त्यांच्या साहित्याच्या कारकीर्दीत भर टाकणारा आहे. त्यांच्या मिळालेल्या सन्मानाबद्दल वकील संघ, तिरोडा, जिल्ह्यातील पोवार समाज बांधव व मित्र परिवाराने त्यांचे कौतुक केले आहे.


**महाराष्ट्र शासन**

**कार्यक़ारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, गोंदिया**

**ई-निविदा प्रणाली अंतर्गत ई-निविदा प्रसिद्ध करणे**

**सुचना क्र.०८ (सन २०२३-२४) प्रथम वेळ (खुला प्रवर्ग)**

**खुला प्रवर्ग यांचेकडून ई-निविदा मागविण्याबाबत.**

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, गोंदिया या कार्यालया अंतर्गत मंजूर कामांचे पपत्र बी-१ मध्ये दोन लिफाफा पद्धतीने ई-निविदा महाराष्ट्र शासनाचे जिल्हा परिषद, सार्वजनिक बांधकाम विभाग, गोंदिया येथे नोंदणीकृत कंत्राटदार खुला प्रवर्ग यांचेकडून ई-निविदा मागविण्यात येत आहेत. प्रसिद्ध कामांची निविदा केवळ ई-निविदा पद्धतीने सादर करावयाची आहे. या निविदेमधिल कामाबाबत अटी व शर्ती ई. संपूर्ण माहिती महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर सविस्तर निविदा प्रसिद्ध दिनांक २८/९/२०२४ पासून पाहण्यास उपलब्ध आहेत. तसेच जिल्हा परिषद, बांधकाम विभाग गोंदिया चे नोटीस बोर्डवर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. याबाबतचे सर्व शुद्धिपत्रके सुद्धा वरिल संकेतस्थळावरच प्रसिद्ध करण्यात येतील.

**ई-निविदा पद्धतीचा तपशिल**

| | |
|---|---|
| ई-निविदा प्रसिद्धी | दिनांक- २८/९/२०२४ पासून |
| ई-निविदा दस्ताऐवज डाउनलोड प्रारंभ (Start) | दिनांक-२८/९/२०२४ सकाळी ११.०० |
| ई-निविदा दस्ताऐवय डाउनलोड समाप्त (End) | दिनांक-०४/१०/२०२४ चे सायं. ५.०० वाजेपर्यंत |
| ऑनलाईन निविदा उघडणे (शक्य झाल्यास) | कार्यकारी अभियंता जि.प.सा.बा.विभाग गोंदिया यांचे कक्षात संबंधित निविदाधारकांचे समक्ष दिनांक ०७/१०/२४ रोजी १.०० वाजेपासून लिफाफा क्रमांक-१ उघडण्यात येईल. (शक्य झाल्यास) |

| स्वाक्षरी | स्वाक्षरी | स्वाक्षरी |
|---|---|---|
| **(अतुलकुमार मेश्राम)** | **(जनार्दन खोटरे)** | **(डॉ.तानाजी लोखंडे)** |
| कार्यकारी अभियंता | मुख्य लेखा व वित्त अधिकारी | अति मुख्य कार्यकारी अधिकारी |
| जि.प.सां.बा.विभाग, गोंदिया | जिल्हा परिषद, गोंदिया | जिल्हा परिषद, गोंदिया |

# भजेपार, डव्वा ग्रामपंचायतीने वाढविला गोंदियाचा गौरव!

## माझी वसुंधरा अभियानात प्रत्येकी राज्यस्तरीय ५०-५० लाखाची बक्षिसे!




**गोंदिया:** माझी वसुंधरा अभियान ४.० मध्ये उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल सडक अर्जुनी तालुक्यातील डव्वा तथा सालेकसा तालुक्यातील भजेपार ग्रामपंचायतीला महाराष्ट्र शासनाने प्रत्येकी ५०-५० लाख रुपयांची राज्यस्तरीय उत्तेजनार्थ बक्षिसे घोषित केली आहेत. या निमित्ताने पुन्हा एकदा गोंदिया जिल्ह्याचा मान राज्यात वाढला आहे.

पर्यावरण संवर्धनासाठी मागील चार वर्षापासून राज्य शासनाच्या वातावरणीय बदल विभागाच्या वतीने माझी वसुंधरा अभियान राबविण्यात येत आहे. राज्यभरातील हजारो ग्राम पंचायती, नगर परिषद, महानगर पालिका यामध्ये वेगवेगळ्या लोकसंख्या गट निहाय ही स्पर्धा असते. जल, अग्नी, वायू, पृथ्वी, आकाश या पंच तत्त्वावर आधारित ही मोहीम पर्यावरण संवर्धनासाठी मैलाचा दगड ठरत आहे. निसर्गाच्या रक्षणासाठी आणि पृथ्वीच्या कल्याणासाठी व्यापक जनजागृती, विविध उपक्रम यांतर्गत राबविले जातात.

स्वच्छ सर्वेक्षण २०२३-२४ मध्ये जिल्ह्यातील भजेपार आणि डव्वा ग्राम पंचायतीनी वर्षभर जनजागृती, विविध पर्यावरण पूरक उपक्रम, इको फ्रेंडली सण उत्सव आदि कामातून हे यश संपादन केले आहे. दोन्ही ग्राम पंचायतींना राज्यस्तरीय उत्तेजनार्थ ५०- ५० लाख रुपयांची बक्षिसे देऊन मुख्य मंत्र्यांच्या हस्ते सत्कार होणार आहे. या कामगिरीबद्दल जिल्हा परिषद अध्यक्ष पंकज रहांगडाले, मुख्य कार्यकारी अधिकारी मुरुगानंथम एम, पंचायत विभागाचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी गोविंद खाम कर यांनी अभिनंदन केले आहे.

### गावकऱ्यांच्या मेहनतीचे चीज झाले

**माझी वसुंधरा अभियान राबविण्यासाठी वर्षभर गावकरी बांधवांची साथ मिळाली. त्यांच्या मेहनतीचे चीज झाले. ग्रामपंचायत मधील माझे सर्व सहकारी, ग्रामस्थ त्याच प्रमाणे प्रशासनाचे जाहीर आभार. पहिल्यांदाच राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त होत असल्याने अत्यानंद झाला आहे.**

**-योगेश्वरी चौधरी, सरपंच डव्वा**




### गावकऱ्यांच्या परिश्रमाला हा पुरस्कार समर्पित

**निसर्गाच्या रक्षणासाठी आणि पृथ्वीच्या कल्याणासाठी वर्षभर सतत उपक्रम राबविले. या उपक्रमांना समस्त ग्रामस्थांनी जीवाचे रान करून भर भरून प्रतिसाद दिला. त्यांचे परिश्रम जिद्द चिकाटी आणि एकोपा यामुळेच हा राज्य स्तरीय सन्मान प्राप्त झाला आहे. त्यामुळे याचे खरे शिलेदार माझे जागरुक ग्रामस्थ आहेत. अभियानाचे नागपूर विभागीय कार्यालय, जिल्हा परिषद, पंचायत समिती येथून वेळोवेळी मार्गदर्शन मिळाले या सर्व घटकांचे आभार. या पुरस्काराने नवी ऊर्जा मिळाली असून भविष्यात पुन्हा जिद्दीने कामाला लागू.**

**चंद्रकुमार बहेकार, सरपंच भजेपार**

# जिल्हयातील बलस्थाने मजबूत करा-राज्यपाल सी.पी राधाकृष्णन



**गोंदिया :** जिल्ह्यातील विविध विकास कामावर भर देवून जास्तीत जास्त लाभार्थ्यांना योजनांचा लाभ मिळण्यासाठी जिल्ह्यातील बलस्थाने मजबूत करा, अशा सूचना राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांनी दिल्या.

राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन हे गोंदिया जिल्ह्याच्या दौऱ्यावर असतांना त्यांनी शासकीय विश्राम गृह येथे विविध योजनांचा आढावा घेतला, त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी नागपुरचे प्रभारी विभागीय आयुक्त डॉ.विपीन इटनकर, जिल्हाधिकारी प्रजित नायर, मुख्य कार्यकारी अधिकारी एम.मुरूगनाथम, उपवनसंरक्षक प्रमोद पंचभाई, औद्योगीक संघटनेचे पदाधिकारी, आदिवासी समुदायाचे प्रतिनीधी, उमेद व अंगणवाडी महिला प्रतिनीधी, राजकिय पक्षाचे प्रतिनीधी तसेच इतर विभागाचे अधिकारी उपस्थित होते. यावेळी जिल्हाधिकारी प्रजित नायर यांनी संगणकीय सादरीकरणाद्वारे जिल्ह्यातील विविध योजनांची व विकासाची माहिती सादर केली.

गोंदिया जिल्ह्यामध्ये आदिवासी विभागाच्या वतीने एकलव्य शाळा वाढविण्यावर भर देवून आदिवासी भागासाठी केंद्र व राज्य शासनाच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या विविध योजना जास्तीत जास्त प्रमाणात लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यावर भर देण्यात यावा असेही त्यांनी यावेळी सांगितले.

गोंदिया जिल्ह्यामध्ये पर्यटन विकसीत होण्यासाठी प्रतापगड, नागझिरा, नवेगावबांध येथे मोठ्या प्रमाणात पर्यटक भेट देत असतात. यासाठी जिल्ह्याच्या पर्यटनासाठी आवश्यक त्या सर्व सोईसुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीन योजना, मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना, पंडित दिनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा, मुख्यमंत्री वयोश्री योजना, मुख्यमंत्री तिर्थ दर्शन योजना, सारस पक्षी, आदिवासी विकास योजना आदी योजने विषयी सादरीकरणाद्वारे माहिती देण्यात आली.

### विधानसभा निवडणुकीत संबंधित यंत्रणांनी समन्वयाने काम करा : प्रजित नायर


**गोंदिया :** आगामी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने नियुक्त करण्यात आलेल्या सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी प्रजित नायर यांनी दिल्या. जिल्हाधिकरी कार्यालयात आज सर्व नोडल अधिकाऱ्यांची बैठक आयोजित करण्यात आली होती, यावेळी ते बोलत होते. बैठकीला पोलीस अधीक्षक गोरख भामरे, मुख्य कार्यकारी अधिकारी एम. मुरुगानंथम, निवासी उपजिल्हाधिकारी भैय्यासाहेब बेहेरे, उपजिल्हा निवडणूक अधिकारी किरण अंबेकर, जिल्हा नियोजन अधिकारी सुनील धोंगडे यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते.लोकसभा निवडणुकीचा अनुभव लक्षात घेऊन निवडणुक आयोगाच्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे. तसेच संबंधित यंत्रणांना दिलेली जबाबदारी चोखपणे पार पाडावी. कुठलीही चुक होणार नाही याची काळजी प्रत्येकाने घ्यावी. तसेच मतदान जनजागृतीसाठी विविध उपक्रम हाती घेऊन व्यापक जनजागृती करावी असे जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी सांगितले.

# मुख्यमंत्री तिर्थदर्शन योजनेअंतर्गत गोंदिया जिल्ह्यातील ५६९ ज्येष्ठ नागरिकांची निवड

**गोंदिया –** मुख्यमंत्री तिर्थदर्शन योजनेअंतर्गत गोंदिया जिल्ह्यातील ५६९ ज्येष्ठ नागरिकांचे प्रस्ताव पालकमंत्री धर्मरावबाबा आत्राम यांचे अध्यक्षतेखालील समितीमार्फत मंजूर करण्यात आले. हे नागरिक लवकरच तिर्थदर्शला जातील असा विश्वास पालकमंत्र्यांनी व्यक्त केला. या योजनेअंतर्गत जिल्ह्यातील ६० वर्षे व त्यावरील जेष्ठ नागरिक भारतातील तीर्थक्षेत्रांची वारी करणार आहेत.

राज्यातील सर्व धर्मियांतील ६० वर्षे वय व त्यावरील ज्येष्ठ नागरिकांना भारतातील तिर्थक्षेत्रांना भेट देण्याची इच्छा पूर्ण करण्यासाठी ङ्गमुख्यमंत्री तिर्थदर्शन योजनाङ्ग राबविण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे.

सदर योजनेअंतर्गत गोंदिया जिल्ह्यात वैष्णोदेवी मंदिर कटरा (जम्मू व काश्मिर) तिर्थक्षेत्राकरीता १३६ ज्येष्ठ नागरीकांची, श्रीराम मंदीर अयोध्या (उत्तरप्रदेश) तिर्थक्षेत्राकरीता २४०, महाबोधी गया तिर्थक्षेत्राकरीता ३३, काशी तिर्थक्षेत्राकरीता २६, विठोबा पंढरपूर तिर्थक्षेत्राकरीता ३२, तिरुपती बालाजी तिर्थक्षेत्राकरीता १७, द्वारकाधीश तिर्थक्षेत्राकरीता ७, काशी विश्वनाथ तिर्थक्षेत्राकरीता ४५, गंगोत्री मंदीर उत्तरकाशी तिर्थक्षेत्राकरीता २, महाकालेश्वर उज्जैन, मंदीर तिर्थक्षेत्राकरीता १०, साईबाबा देवस्थान शिर्डी तिर्थक्षेत्राकरीता ८, सिद्धीविनायक मंदीर तिर्थक्षेत्राकरीता ५,केदारनाथ तिर्थक्षेत्राकरीता ३, अजमेर दर्गा तिर्थक्षेत्राकरीता ३, जगन्नाथ पुरी, तिर्थक्षेत्राकरीता १, रामेश्वरम तिर्थक्षेत्राकरीता१, असे एकूण १६ तिर्थक्षेत्राकरीता एकूण ५६९ ज्येष्ठ नागरिकांची निवड करण्यात आली आहे. ज्येष्ठ नागरिक लवकरच श्रीराम मंदिर, अयोध्या ची मोफ्फत वारी करणार आहेत.




सदर तिर्थदर्शन योजनेकरीता जिल्ह्यातील ६० वर्षे वय व त्यावरील ज्येष्ठ नागरिकांनी सहायक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय, गोंदिया डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, जिल्हाधिकारी कार्यालयाचे मागे, पतंगा मैदान, गोंदिया येथे आवश्यक कागदपत्रांसह प्रस्ताव सादर करावे असे विभागाचे वतीने आवाहन करण्यात येत आहे. विनोद मोहतुरे, सहायक आयुक्त, समाज कल्याण कल्याण, गोंदिया यांनी केले आहे.

# २२ गावांनी वाढविले मलेरिया, डेंग्यू आजाराचे संकट

## आरोग्य विभागाचे सर्वेक्षण, गावांमध्ये डासनाशक फवारणी सुरु






**गोंदिया:** आरोग्य विभागाने डेंग्यू मलेरिया या कीटकजन्य आजाराच्या पार्श्वभुमीवर जिल्ह्यातील ११६ गावांमध्ये सर्वेक्षण केले. यात २२ गावांतील लोकांनी कीटकजन्य आजार हिवताप व डेंग्यूचा धोका वाढविला आहे. या गावांमधील घरांमध्ये पाणीसाठे, कुंडयामध्ये हिवताप, चिकुनगुनिया, डेग्यूचा डासांच्या अळ्या आढळून आल्या आहेत. हिवताप, डेंग्यू, चिकुनगुनिता या रोगांबाबत केलेल्या कीटक सर्वेक्षणातून ही धक्कादायक बाब पुढे आली आहे.

जिल्ह्यात शहरी व ग्रामीण गात हिवताप, डेंग्यू, चिकुनगुनियाबाधित आणि जिल्हा आरोग्य यंत्रणा अलर्ट मोडवर आली आहे. आरोग्य विभागाची यंत्रणा कार्यान्ति झाली आहे. जिल्ह्यातील आरोग्य कर्मचारी यात आरोग्य सेवक, आरोग्य सेविका व आशा सेविका यांच्यासह आरोग्य सहायक यांच्यामार्फत संबंधित परिसरात कीटशास्त्रीय सर्वेक्षणासह पाणी साठ्यांची तपासणी केली जात आहे. यात डास अळी प्रतिबंधक टेमिफॉस औषध टाकले जात आहे. काही पाणीसाठे नष्ट केले आहेत. ि

जल्हा आरोग्य विभागामार्फत ११ लाख ४६ हजार ७६६ घरांचे सर्वेक्षण केले असून ३ लाख ७६ हजार १६७ पाण्याचे साठे तपासले. त्यापैकी ४ हजार १९४ पाणीसाठी दुषित आठळले.

### त्या २२ गावांमध्ये प्रतिबंधात्मक उपाययोजना सुरु

**जिल्ह्यातील २२ गावांमध्ये डासांच्या अळ्या आढळल्या आहेत. ग्रामीण व शहरी भागासह जिल्ह्यात हिवताप व डेंग्यू रुग्ण जरी वाढत असले तरी आरोग्य यंत्रणा अलर्ट मोडवर काम करीत आहे. खबरदारी म्हणून परिसरात कीटकशास्त्रीय सर्वेक्षणासह पाणीसाठ्यांची तपासणी घेतली जात आहे. यामध्ये जानेवारी व जुलै अखेरपर्यंत ३ हजार ३८८ ठिकाणी गप्पे मासे सोड मोहिमेसोबत कीटकनाशक फवारणी केल्याची माहिती जिल्हा अधिकारी यांनी दिली.**

# स्वच्छतेच्या अनुषंगाने उत्कृष्ट कामगिरीसाठी

## जिल्हाधिकारी प्रजित नायर यांचा गौरव



**गोंदिया :** संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान राबविताना अभियान कालावधीत उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल जिल्हा परिषद सिंधुदुर्गचे तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी व विद्यमान गोंदिया जिल्हाधिकारी प्रजित नायर यांना २३ सप्टेंबर रोजी छत्रपती संभाजी नगर येथे आयोजित राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा कार्यक्रमांत गौरविण्यात आले. या कार्यक्रमाला महत्वाच्या कामामुळे ते उपस्थित राहु शकले नाही. त्यांच्या वतीने पुरस्कार जिल्हा परिषद गोंदियाचे पाणी व स्वच्छता विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी आनंदराव पिंगळे यांनी स्विकारला.

सदर पुरस्काराचे स्मृतिचिन्ह व प्रशस्तीपत्रक जिल्हाधिकारी प्रजित नायर यांनी २६ सप्टेंबर रोजी स्वीकारत आनंद व्यक्त केला. यावेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी पाणी व स्वच्छता आनंदराव पिंगळे तसेच जिल्हा पाणी व स्वच्छता विभाग शालेय स्वच्छता व आरोग्य सल्लागार भागचंद्र रहांगडाले उपस्थित होते. छत्रपती संभाजी नगर येथे आयोजीत कार्यक्रमाला पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील, अल्पसंख्यक व पणन मंत्री अब्दुल सत्तार, गृहनिर्माण मंत्री अतुल सावे, खासदार भागवत कराड, पाणी व स्वच्छता विभागाचे प्रधान सचिव संजय खंदारे यांची उपस्थिती होती.

संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान अंतर्गत पुरस्कार प्राप्त ग्रामपंचायतीने केलेल्या तयारीचा ग्रामपंचायत पदाधिकारी, संबंधित अधिकारी व कर्मचारी यांच्या समवेत आढावा घेणे, राज्यस्तरीय तपासणी समिती समवेत तपासणी वेळी वा तपासणीच्या अगोदर ग्रामपंचायतींमध्ये प्रत्यक्ष उपस्थित राहून शासन निर्णयामध्ये नमूद निर्देशानुसार परिपूर्ण अहवाल तयार करण्याच्या सूचना वा मार्गदर्शन करणे, ग्रामस्थ व पदाधिकारी यांचे मनोधैर्य वाढविणे, ग्रामपंचायतीस राज्यस्तरावरील पुरस्कार मिळण्यामध्ये मौलिक योगदान, संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान प्रभावी अंमलबजावणी व या अभियानामध्ये उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल विद्यमान जिल्हाधिकारी व तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी सिंधुदुर्ग प्रजित नायर यांना गौरविण्यात आले.

### कामगार पेटी वाटपदरम्यान चेंगराचेंगरी, सहा महिला गंभीर जखमी

**भंडारा :** बांधकाम पेटी योजनेअंतर्गत कामगार कार्यालयाच्या वतीने सुरू असलेल्या पेटी वाटपाचा कार्यक्रमात शेकडो महिलांची गर्दी उसळली व एकच गोंधळ उडाला. यावेळी महिला सैरावरा पळू लागला. त्यानंतर झालेल्या चेंगराचेंगरीत पाच ते सहा महिला गंभीर स्वरूपात जखमी झाल्याचे वृत्त आहे.

याबाबत अतिरिक्त पोलीस अधीक्षक ईश्वर कातखेडे यांना विचारणा केली असता त्यांनी सांगितले की, पेटीसाठी रात्री दोन पासून या ठिकाणी महिला एकत्र जमल्या होत्या. सकाळी पेटी वाटप सुरू झाल्यानंतर महिलांची गर्दी उसळल्याने चेंगराचेंगरी झाली. त्यात काही महिला जखमी झाल्या. मात्र, त्यावेळी तेथे एकच अंमलदार होता त्यामुळे पोलिसांकडून लाठीचार्ज झाल्याच्या वृत्तात सत्यता नाही, असे कातखेडे म्हणाले.

# आता बीएएमएस पदवीधर होणार कंत्राटी वैद्यकीय अधिकारी

**गोंदिया :** सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट ब या संवर्गातील रिक्त पदांवर नियमित वैद्यकीय अधिकारी उपलब्ध होईपर्यंत रिक्त जागेवर आयुर्वेद पदवीधारकांना (BAMS ) कंत्राटी वैद्यकीय अधिकारी म्हणून विविध शासकीय आरोग्य आस्थापनात नियुक्त करण्यात येणार आहे. या संदर्भातील शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. यामुळे गोंदिया जिल्ह्यासह राज्यातील हजारो आयुर्वेद पदवीधर उमेदवारांना मोठा दिलासा मिळाला आहे.

राज्यातील सार्वजनिक आरोग्य सेवा यंत्रणेला रिक्त पदांचे ग्रहण लागले आहे. यामुळे सार्वजनिक आरोग्य सेवेतील कामकाज आणि लाखो सर्वसामान्य जनता, रुग्ण यांना आरोग्य सेवा मिळण्यात मोठी अडचण होत आहे. सार्वजनिक आरोग्य सेवा अंतर्गत महाराष्ट्र वैद्यकीय अधिकारी (गट ब) ची भरमसाठ पदे रिक्त आहेत. गोंदिया जिल्ह्यासह राज्यातील बहुतेक जिल्ह्यात असेच विदारक चित्र आहे. जिल्हा सामान्य रुग्णालय, उप जिल्हा रुग्णालय, ग्रामीण रुग्णालय, प्राथमिक आरोग्य केंद्र या सर्वच आरोग्य आस्थापनात अशीच स्थिती आहे.

यासंदर्भात केंद्रीय आयुष, आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री जाधव यांनी, राज्य सरकारच्या आरोग्य विभागाला नियमित नियुक्त्या होईपर्यंत पर्यायी वैधकीय अधिकारी नेमण्याचे निर्देश नुकतेच दिले होते. याची गंभीर दखल घेत राज्य शासनाच्या सार्वजनिक आरोग्य सेवा विभागाने (खातयान`) नियमित नियुक्त्या होईपर्यंत आयुर्वेद पदवीधर उमेदवारांना कंत्राटी वैद्यकीय अधिकारी (गट ब) नियुक्त करण्याचा निर्णय घेतला. या संदर्भात २४ सप्टेंबर २०२४ रोजी आरोग्य विभागाने शासन निर्णय देखील निर्गमित केला आहे. त्यामुळे आता बीएएमएस डॉक्टरांना कंत्राटी वैद्यकीय अधिकारी (गट ब) म्हणून नियुक्ती मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.



त्यामुळे आता बीएएमएस डॉक्टरांना कंत्राटी वैद्यकीय अधिकारी (गट ब) ) म्हणून नियुक्ती मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. राज्यातील उपजिल्हा रुग्णालय, आयुर्वेद व अलोपॅथी दवाखाने, ग्रामीण रुग्णालय, प्राथमिक आरोग्य केंद्र, फिरती आरोग्य पथके, दवाखाने यामध्ये महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गटफ बफ या संवर्गातील पद कंत्राटी पद्धतीने आणि आयुर्वेद पदवीधर मधून भरण्यात येणार आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या २० डिसेंबर २०२२ रोजीच्या शासन निर्णय मधील अटी आणि शर्ती ला अनुसरून या नियुक्त्या करण्यात येणार आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाअंतर्गत महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट "ब' या संवर्गातील रिक्त पदांवर नियमित वैद्यकीय अधिकारी उपलब्ध होईपर्यंत रिक्त जागेवर बी ए एम एस अहर्ताधारकांना कंत्राटी वैद्यकीय अधिकारी म्हणून नियुक्ती देण्यात येणार आहे.

### पाच हजाराची लाच घेतांना महिला सरपंच जाळ्यात

**गोंदिया:–** तिरोडा तालुका अंतर्गत येत असलेल्या इंदोरा(खुर्द) येथील महिला सरपंच सरीता सुनिल तुमसरे यांना आज १ ऑक्टोंबरला पाच हजार रुपयाची लाच घेतांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने रंगेहाथ पकडले असून तिरोडा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे. तक्रारदार हे इंदोरा(खुर्द) येथीलच रहीवासी असून ग्रामरोजगार सेवक म्हणून कार्यरत आहेत.त्यांचे मार्च ते जून या चार महिन्याचे मानधन ५३२०० रुपयाचा धनादेश ग्रामसेवक यांनी स्वतःची स्वाक्षरी करुन तक्रारदाराकडे दिला.तक्रारदार त्या धनादेशावर स्वाक्षरीकरीता सरपंचाकडे गेले असता त्यांना पाच हजार रुपये लाचेची मागणी केली.

तक्रारदाराला लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी गोंदिया येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार नोंदवली.त्या तक्रारीच्या आधारे आज मंगळवारला सापळा रचून महिला सरपंच सरीता तुमसरे यांना पाच हजार रुपये पंचासमक्ष स्विकारतांना रंगेहाथ पकडण्यात आले.

# आरोग्य शिबिरात आढळले २६९ गंभीर आजारी

## पोलिस दादालोरा खिडकी योजनेंतर्गत आरोग्य शिबिर, ३०० नागरिकांची मोतिबिंदू मोफत शस्त्रक्रिया



**गोंदिया:** लगतच्या ग्राम कारंजा येथील पोलिस मुख्यालयात गुरुवारी (दि.२६) मोफत महाआरोग्य रोगनिदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात १०५६ जणांची तपासणी व औषधौपचार करण्यत आले. यामध्ये २६९ जणांना तपासणी करुन गंभीर आजार करिता नागपूरला रवाना करण्यात आले. नागपूर येथील डॉ. शालिनीताई मेघे रुग्णालात त्यांच्यावर मोफत उपचार करण्यात येणार आहे.

जिल्हा हा नक्षल प्रभावित जिल्हा असून जिल्हा पोलिस दलातर्फे जिल्ह्यातील जनतेच्या हिताकरिता (विशेषत नक्षलग्रस्त भागातील जनतेच्या कल्याणाकरिता कायम अग्रेसर राहून पोलिस दादालोरा एक खिडकी योजनेच्या माध्यमातून विविध कल्याणकारी नावीण्यापूर्ण उपक्रम वेळोवेळी राबविण्यात येतात. त्याचाच एक भाग म्हणून पोलिस अधीक्षक गौरख भामरे यांच्या संकल्पनेतून आणि अपर पोलिस अधीक्षक नित्यनंद झा यांच्या मार्गदर्शनात नावीण्यापूर्ण उपक्रमांतर्गत जिल्ह्यातील दुर्गम, अतिदुर्गम भागातील गोरगरीब, तसेच आदिवासी बांधवांचे आरोग्य निरोगी राहावे यादृष्टीने जिल्हा पोलिस दल, ट्रायबल वेलफेयर कमीटी, रोटरी डिस्ट्रीक्ट सह आयोजक शालिनीताई मेघे हॉस्पीटल व रिसर्च सेंटर व रोटरी क्लब ऑफ नागपूर, जीवन आधार सामाजिक संस्था तसेच माउली मित्रमंडळ (नागपूर) यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवारी (दि.२६) पोलिस मुख्यालयात मोफत महाआरोग्य रोगनिदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

अध्यक्षस्थानी उपभिवागीय पोलिस अधिकारी प्रमोद मडामे होते. पाहुणे म्हणून ट्रायबल वेलफेयर कमिटीचे चेअरमन राजीर वरभे, जीवन आधार बहुउद्देशिय संस्थेचे अध्यक्ष जीतन जवंजाळ, रोटरी क्लब ऑफ नागपूरचे अध्यक्ष प्रतीक्षा मायी, शालिनीताई मेघे हॉस्पीटल नागपूरचे व्यवस्थापक अश्विन रडके, माउली सेवा मित्र मंडळ अध्यक्ष सुहास खरे उपस्थित होते. नक्षलग्रस्त प्रभावित ग्रामीण भागातील आदिवासी समाज बांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन शिबिराचा लाभ घेतला. शिबिरासाठी राखीव पोलिस निरीक्षक रमेश चाकाटे, पोऊउनि. रोशन उईके, सहायक फौजदार मुस्तफा सरवर, हवालदार लियोनाई मार्टिन, मंगला प्रधान, राज वैद्य, भास्कर हरिणखेडे यांनी सहकार्य केले.

# राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांनी घेतली विविध शिष्टमंडळांची भेट

**गोंदिया :** राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी गोंदिया येथील शासकीय विश्रामगृहामध्ये विविध क्षेत्रातील शिष्मंडळांची भेट घेतली व त्यांची विविध विषयांवरील मते जाणून घेतली. यामध्ये राजकीय पक्षांचे प्रतिनिधी, सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी, क्रीडा, कला, सामाजिक, आदिवासी, कृषी, औद्योगिक आदी क्षेत्रातील प्रतिनिधींची भेट घेवून जिल्ह्यातील विविध प्रश्न व समस्या जाणून घेतल्या.



आदिवासी क्षेत्रामध्ये उद्योग वाढविण्यासाठी राज्य शासनाच्या विविध योजनांचा लाभ लाभार्थ्यांपर्यत जास्तीत जास्त प्रमाणात पोहोचला पाहिजे यासाठी राज्यपाल यांनी यावेळी अधिकाऱ्यांना सूचना दिल्या. गोंदिया जिल्ह्यामध्ये भाताची लागवड मोठ्या प्रमाणात करण्यात येते, परंतु सप्टेंबर महिन्यामध्ये जिल्ह्यात झालेल्या पावसामुळे भात पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले.

भात क्षेत्रामध्ये अत्याधुनिक कृषी क्षेत्राचा वापर करण्यात यावा तसेच जिल्ह्यामध्ये ड्रगनफुट लागवड संदर्भात भालचंद्र ठाकुर यांनी माहिती दिली. राईस इंडस्ट्रीज यांच्या समस्या जाणून घेवून त्याचा पाठपुरावा करण्याबरोबरच जिल्ह्यातील सर्व उद्योग आणि व्यावसायिकांनी सोलार एनर्जीचा वापर करून सोलार सारख्या महत्त्वाच्या विषयाला प्रोत्साहन देण्याची गरज राज्यपालांनी व्यक्त केली.

जिल्ह्यात क्रीडा संस्कृती जिल्ह्यामध्ये रूजविण्यासाठी खेळाडूंना प्रोत्साहन देण्याची गरज व्यक्त करून बास्केटबॉल, टेनिस सारख्या खेळाची साधने उपलब्ध करून देण्यासाठी क्रीडा विभागाने प्रयत्न करावे, असे राज्यपालांनी यावेळी संबंधित विभागाला सुचना दिल्या.